# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.७/२०२१** **दिनांक २६.१२.२०२१**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ-दुपारी ०३.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, अधिनियम-२००४, (२००४, चा महा.१४) कलम ५, मधील पोटकलम (१) आणि त्यासोबत पोटकलम (२) अन्वये व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने) नियम-२०१३, मधील तरतूदीनुसार राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाचे, दि.१६ सप्टेंबर, २०२१, रोजीचे अधिसूचनेनुसार, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती गठीत करणेत आलेली असून जा.नं.एसएसएस/वशी-०४/३१७६/२०२१, दि.१८.१२.२०२१, रोजीचे पत्रान्वये मा.व्यवस्थापन समितीची पहिली सर्वसाधारण सभा रविवार दि.२६.१२.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आली असलेबाबत मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दि.२६.१२.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.आ.श्री. आशुतोष अशोकराव काळे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

**१. मा.आ.श्री. आशुतोष अशोकराव काळे. अध्यक्ष**
**२. मा.ॲड. जगदीश हरिश्चंद्र सावंत, उपाध्यक्ष**
**३. मा.श्रीमती अनुराधा गोविंदराव आदिक, सदस्य**
**४. मा.ॲड. सुहास जनार्दन आहेर, सदस्य**
**५. मा.श्री. अविनाश अप्पासाहेब दंडवते, सदस्य**
**६. मा.श्री. सचिन रंगराव गुजर, सदस्य**
**७. मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, सदस्य**
**८. मा.श्री. जयवंतराव पुंडलिकराव जाधव, सदस्य**
**९. मा.श्री. महेंद्र गणपतराव शेळके, सदस्य**
**१०. मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, सदस्य**
**११. मा.श्री. शिवाजी अमृतराव गोंदकर, सदस्य**

**मा.श्रीमती भाग्यश्री बानायत,** भा.प्र.से.
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.रराहूल नारायण कनाल यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

**यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

---

**विषय नं.०१** **दि.२३.११.२०२१ रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३३८** दिनांक २३.११.२०२१ रोजी शिर्डी येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली. तसेच सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

१. **विषय नं.२६**-संस्थानचे विद्युत विभागासाठी दैनंदिन मेन्टेनन्स कामासाठी विद्युत साहित्य खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्र.२९९-** निम्नतम निविदाधारक यांनी दर कमी करणेस असमर्थ असल्याचे ई-मेलव्दारे कळविले आहे. ई-निविदोतील नमुद दर स्विकारणेत येऊन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**निर्णय क्र.२९९- निम्नतम निविदाधारक यांनी दर कमी करणेस असमर्थ असल्याचे ई-मेल व्दारे कळविले आहे. या ई-निविदेतील एकुण ७७ आयटेम्सपैकी ४५ आयटेम्सचे दर हे महाराष्ट्र शासनाचे खरेदी नियमावलीतील ३.१.२.१ या नियमाप्रमाणे अंदाजित किंमतीपेक्षा (+)१०% पेक्षा जास्त आहे. या अ.नं.२,८,१०,१२,१३,१४,१५,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२७,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४२,४३,४४,४७,५१,५२,५४,५५,५६,५७,५८,६२,६४,६५,६६,६७,६९,७०,७२,७५ आणि अ.नं.७७ या ४५**

**आयटेम्ससाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली. उर्वरीत १५ आयटेम्सचे दर हे (-)२०% पेक्षा कमी तर १७ आयटेम्सचे दर हे खरेदी नियमावलीप्रमाणे नियमात बसणारे असल्याने असे एकूण ३२ आयटेम्स अ.नं.१,३,४,५,६,७,९,११,१६,१७,२५,२६,२८,२९,३०,३१,४१,४५,४६,४८,४९,५०, ५३, ५९, ६०, ६१,६३,६८,७१,७३,७४,आणि ७६ असे एकूण ३२ आयटेम्ससाठी ई-निविदेतील नमुद दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

२. **आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३-** कॅन्टीन विभागासाठी सन २०२१-२२ (आक्टोंबर २०२१ ते सप्टेंबर, २०२२) या वर्षासाठी चहा पावडर खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत व फिल्टर कॉफीसाठी दरपत्रके मागविणेबाबत.

**निर्णय क्र.३२८-** निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांचा कार्यादेश देण्यास मान्यता आली. चर्चेअंती देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३२८ म्हणून जोडण्यात आलेला आहे. (कार्यवाही-खरेदी विभाग)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**निर्णय क्र.३२८- निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांचा कार्यादेश देण्यास मान्यता आली. चर्चेअंती देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३२८ म्हणून जोडण्यात आलेला आहे. तसेच फिल्टर कॉफीसाठी दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

३. **आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५-** प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन आणि मंदिर विभागासाठी सन २०२१-२२ (आक्टोंबर २०२१ ते सप्टेंबर,२०२२) या वर्षासाठी मसाले खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्र.३३०-** निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंति देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांचा कार्यादेश देण्यास मान्यता आली. चर्चेअंति देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३३० म्हणून जोडण्यात आलेला आहे. (कार्यवाही-खरेदी विभाग)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**निर्णय क्र.३३०- निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३३० म्हणून जोडण्यात आलेला आहे. तसेच खसखस व नाकेश्वर या दोन आयटेमसाठी दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

४. **आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६-** संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी सन २०२१-२२ (आक्टोंबर २०२१ ते सप्टेंबर, २०२२) वर्षासाठी किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी, ड्रायफ्रुटस, वनस्पती तूप व इतर वस्तु खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्र.३३१-** निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांचा कार्यादेश देण्यास मान्यता आली. चर्चेअंती देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३३१ म्हणून जोडण्यात आलेला आहे. (कार्यवाही-खरेदी विभाग)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**निर्णय क्र.३३१- निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३३१ म्हणून जोडण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रस्तावातील "आ" मधील नमुद अ.नं. २८,३२ व ३४ या तीन आयटेम्स सदर तरतुदीनुसार किंमत श्रेणीमध्ये बसत नाहीत. त्याआयटेम्सची खरेदी करण्यासाठी तसेच प्रस्तावातील "इ" मधील नमुद ९ आयटेम्ससाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.०२** **साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे सध्या कार्यरत आऊटसोर्स ठेकेदाराकडून ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आहे त्याच मंजूर दरात करुन घेणेकामी मुदतवाढ कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** २१ (१) (ग) " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे." व (२) पोट कलम (१) (ख) "भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्तावीक:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे तरतुदीनुसार श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी साईआश्रम भक्तनिवास विभागात एकूण १५३६ खोल्या, साईधर्मशाळा विभागात १९२ हॉल व व्दारावती भक्तनिवास विभागात ३१६ खोल्या वापरात आहेत. या विभागांतील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स ठेकेदारामार्फत करुन घेतले जाते.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.३६ निर्णय क्र.७७ अन्वये सन २०२०-२१ करीता साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या GST वगळून अंदाजे रु.१८,३१,३१,४९६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

त्यानुसार विधी विभागामार्फत दि.२६/०२/२०२० रोजी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आले. त्यावर P.I.L. 120/2019 मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं.३००९/२०२० मधील अ.नं.१४ अन्वये साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.७३,७५,७७ निर्णय क्र.५२५, ५२७, ५२९ नुसार अनुक्रमे साई धर्मशाळा, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी सुमित फॅसिलिटीज् लि पुणे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी सुमित फॅसिलिटीज् लि पुणे यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधीकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/२८७२/ २०२० दि.२९/१२/२०२० अन्वये, साईधर्मशाळा विभागाकरीता जा.नं.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/२८७३/ २०२० दि.२९/१२/२०१९ अन्वये व व्दारावती भक्तनिवास विभागाकरीता जा.नं.एसएसएस/वशी-व्दारावती भक्तनिवास/२८७४/२०२० दि.२९/१२/२०२० अन्वये खालील कोष्टकात नमुद केलेप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

| विभागाचे नाव | मनुष्यबळ संख्या | मशिनरी संख्या | इतर साहित्य | GST वगळून दरमहा रक्कम रु. | १८%GST सह दरमहा रक्कम रु. | GST वगळून वर्षाला रुपये | १८%GST सह वर्षाला येणारा खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| साईआश्रम भक्तनिवास | ५३६ | ८४ | १६१ | ७४,००,८७६ | ८७,३३,०३३.६८ | ८,८८,१०,५१२.१२ | १०,४७,९६,४०४.३० |
| साईधर्मशाळा | २३१ | ४६ | ६६ | ३१,७४,०४५.०१ | ३७,४५,३७३.११ | ३,८०,८८,५४०.१२ | ४,४९,४४,४७७.३४ |
| व्दारावती भक्तनिवास | ७६ | ११ | ३२ | १०,५३,७९०.०१ | १२,४३,४७२.२१ | १,२६,४५,४८०.१२ | १,४९,२१,६६६.५४ |

**मागणीः-** उपरोक्त कोष्टकात नमुद केलेप्रमाणे मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णयानुसार साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन देणेकामी सुमित फॅसिलिटीज् लि पुणे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी सुमित फॅसिलिटीज् लि पुणे यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधीसाठी देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१/१२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने, सन २०२१-२२ मधील दि.०१/०१/२०२२ ते दि.३१/१२/२०२२ या कालावधीकरता दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.१६,७४,५०,५५८/- खर्चास मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची चक्रिय पध्दतीने दि.०९/११/२०२१ रोजी मान्यता मिळालेली आहे.

सदर कामाचा ई-निविदा मसुदा दस्तऐवज तपासणी समिती सभेत दि.१९/११/२०२१ रोजी तपासणी करण्यात आली असून, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन विधी विभागामार्फत दि.१६/११/२०२१ रोजी सादर करण्यात आले असून, मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येईल. परंतू ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होणेस कालावधी लागल्यास, ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो कार्यादेशातील "नविन कंत्राटदाराला पुढील वर्षासाठी कार्यादेश पारीत होऊन नविन कंत्राटदाराने काम सुरु करेपर्यंत किंवा ०३ महिने पावेतो आहे त्याच मंजूर दरात काम करुन देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही." अशी अट नमूद आहे. सदर अटी व शर्तीनुसार संबंधीत हाऊसकिपींग ठेकेदारास आहे त्याच मंजूर दरात व कार्यादेशातील सर्व अटी शर्तीस अधिन राहून सध्या साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकडे काम करत असलेले ठेकेदार सुमित फॅसिलिटीज् लि पुणे यांचेकडून काम करुन घ्यावे लागणार आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय–** साईभक्तांना देण्यात येणा-या निवासव्यवस्थेतील खोल्या, हॉलमध्ये व परिसरात अस्वच्छता होऊन साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची तसेच व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन देणेकामी आऊटसोर्स ठेकेदार सुमित फॅसिलिटीज् लि पुणे यांचा कामाचा कालावधी दि.३१/१२/२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने, तीनही विभागाकडील ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्या काम करत असलेले आऊटसोर्स ठेकेदाराकडून आहे त्याच मंजूर दरात व अटी शर्तीनुसार करुन घेणेकामी दि.३१/०१/२०२२ पर्यंत अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन, नविन ठेकेदाराची नेमणूक होऊन कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत सध्या तीनही विभागाकडे कार्यरत असलेल्या आऊटसोर्स ठेकेदारास मुदतवाढ देणेस मान्यता असावी, ही विनंती.

सदर प्रस्तावास मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.३३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना देण्यात येणा-या निवासव्यवस्थेतील खोल्या, हॉलमध्ये व परिसरात अस्वच्छता होऊन साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इत्यादी दुरुस्ती व देखभालीची तसेच व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/ स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी सदर कामाचे सध्याचे ठेकेदार सुमित फॅसिलिटीज् लि. पुणे यांना आहे त्याच मंजूर दरात व अटी शर्तीनुसार दि.३१/०१/२०२२ पर्यंत अथवा याकामी राबविणेत येत असलेली ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणूक होऊन कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभाग/व्दारावती भक्तनिवास)**

---

**विषय नं.०३** **साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामासाठी सध्या कार्यरत ठेकेदाराकडुन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो आहे त्याच मंजुर दरात करुन घेणेकामी मुदतवाढ कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम- (१)१४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे.(२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** मा.तदर्थ समितीचे दि. २३/११/२०२१ रोजीचे विषय नं.०२ व निर्णय क्र.२७५/८ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन अंदाजित रक्कम रु.१० लाखाचे आंत असलेतरीही ई-निविदा प्रक्रियेमध्ये स्पर्धात्मक व कमी दराने सेवा मिळु शकते म्हणुन प्रस्ताव ''ब'' दरपत्रकाऐवजी ई-निविदा नमूद करुन 'ब' प्रस्तावास अनुमोदन देण्यात येवून त्याकामी येणा-या रु. ८,८९,६६३/- GST सह ग्राह्य धरुन विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणे कामी दि.९/११/२०२१ रोजीचे चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

प्रस्ताविक:- श्रींच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे निवासासाठी साईआश्रम भक्तनिवास या विभागाकडे १२ इमारती असुन, एका इमारतीमध्ये १२८ रुम याप्रमाणे एकुण १२ इमारती मध्ये १५३६ रुम्स आहेत.

तसेच साईधर्मशाळा विभागात एकुण ६ इमारती आहेत. एका इमारतीत ३२ हॉल प्रमाणे एकुण ६ इमारतीमध्ये १९२ हॉल असुन, सदरील रुम/हॉलमध्ये सहली, ग्रुपने येणारे साईभक्त,अंध/अपंग इत्यादींची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

मा. तदर्थ समिती दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५२६ सन २०२० -२१ या आर्थिक वर्षासाठी (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ ) करीता साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी पेस्ट टर्मिनेटरर्स, पुणे यांचे रु. १.३५ पैसे मात्र प्रती चौ.फुट अंतिम दर स्विकारणेत येऊन सहा फवारणी कामी रु.६,१४,४३२/-(सहा लाख चौदा हजार चारशे बत्तीस मात्र ) GST वगळुन कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागासाठी एकूण मंजूर झालेल्या दराचा तपशील खालीलप्रमाणे.**

| अ.नं | औषध फवारणी कामाचा तपशिल | Pest Control | | |
|---|---|---|---|---|
| | | (GST दर वगळुन) प्र. स्क्वे.फुट रु. पै. | प्रत्येकी दोन महिन्यातून एका फवारणी करीता दर रुपये. पै | सहा फवारणी करीता एकुण रक्कम रुपये. पै |
| १ | साई आश्रम भक्तनिवास<br>एकुण क्षेत्रफळ -३४९७३५.०० चौ.फुट | एकुण सहा फवारणीचा एकत्रीत चौ. फुट दर रु. ०१.३५ पै. | ७८,६९०.३७ | ४,७२,१४२.२५ |
| | साई धर्मशाळा<br>एकुण क्षेत्रफळ -१०५३९९.६८ चौ.फुट | एकुण सहा फवारणीचा एकत्रीत चौ. फुट दर रु. ०१.३५ पै. | २३,७१४.९२ | १,४२,२८९.५६ |
| | **साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा एकुण रक्कम** | **६,१४,४३१.८२** | | |
| | **पुर्णांकित रक्कम** | **६,१४,४३२.००** | | |
| | | **अक्षरी – सहा लाख चौदा हजार चारशे बत्तीस मात्र** | | |

तथापी कोरोनो विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी साई आश्रम भक्तनिवासस्थान व साई धर्मशाळा विभागातील निवासव्यवस्था दि.१७/०३/२०२० पासुन पुढील आदेश होईपर्यंत बंद करण्यात आली आहे. साईआश्रम भक्तनिवास विभागात पेस्ट टर्मिनेटरर्स, पुणे यांचे कडून आज अखेर ०१ औषध फवारणी करण्यात आली असुन ०५ औषध फवारण्या बाकी आहेत. तसेच साई धर्मशाळा विभागातील ०४ (A,B,E,F) इमारतीमध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी रुग्णांची संस्थात्मक विलगीकरण व कोव्हीड सेंटरसाठी दि.०५/०४/२०२० पासुन वापरण्यात देण्यात आलेल्या असल्याने ०१ ही फवारणी झालेली नाही. किटकनाशक

औषध फवारणी कामी पेस्ट टर्मिनेटरर्स, पुणे यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत ३१/१२/२०२१ अखेर सपुंष्ठात येत आहे.

साईभक्तांना ढेकुण, डास, झुरळे इ. चा त्रास होऊ नये याकरीता संस्थानचे निवासस्थानामध्ये वेळोवेळी औषध फवारणी होणे गरजेचे आहे. साईआश्रम भक्तनिवास आणि साई धर्मशाळा या निवासस्थानामध्ये किटकनाशक औषध फवारणी पुर्ण करुन साईभक्तांना सेवा पुरविणे आवश्यक आहे.

**मागणी-** साईभक्तांना ढेकुण, डास, झुरळे इ.चा त्रास होऊनये याकरीता संस्थानचे दोन्ही निवासस्थानामध्ये वेळोवेळी औषध फवारणी होणे गरजेचे आहे. सन २०२०-२१ करीता दि.०१/०१/२०२१ ते ३१/१२/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी देण्यात आलेली मुदत दि.३१/१२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने, साईभक्तांना ढेकुण,डास,झुरळे इ.चा त्रास होऊ नये यासाठी सन २०२१-२२ मधील दि.०१/०१/२०२२ ते ३१/१२/२०२२ करीता नवीन ठेकेदारची नेमणूक करणेकामी नव्याने जनसंपर्क विभागा मार्फत दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणे व त्याकामी येणा-या खर्चास मा.तदर्थ समितीचे दि.२३/११/२०२१ रोजीचे विषय नं.०२ व निर्णय क्र.२७५/८ नुसार खर्चास मान्यता मिळाली असुन, ई-निविदा मसुदा तयार करुन सदर मसुदा दस्तऐवज तपासणी समितीकडून तपासणी करणेत येत आहे. ई-निविदा प्रक्रिया राबविणेस कालावधी लागल्यास तसेच सध्या कार्यरत असलेल्या पेस्ट कंट्रोल धारकाचा कामाचा कार्यादेश दि.३१/१२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने कार्यादेशातील अट क्र.२९ 'नविन ठेकेदाराला पुढील कार्यादेश पारीत होऊन नविन ठेकेदाराने काम सुरु करेपर्यंत आहे त्याच मंजुर दरात काम करुन देणे आपणावर बंधनकारक राहील. वाढीव कालावधीसाठी कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही.' अशी अट नमुद असून साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागाकडील पेस्ट कंट्रोल ठेकेदार पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांचेकडुन आहे त्याच मागील मंजुर दरात व अटी शर्तीनुसार दि.३१/०१/२०२२ पर्यंत अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ कार्यादेश देऊन कामे करुन घेता येईल.

कोरोनो विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी साई आश्रम भक्तनिवासस्थान व साई धर्मशाळा विभागातील निवासव्यवस्था बंद करण्यात आली आहे. पेस्ट टर्मिनेटरर्स, पुणे यांचा दि.०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२१ या एक वर्ष कालावधीत ०६ औषध फवारणी साठी झालेला खर्चाचा तपशिल -

| अ.नं. | महीना | साईआश्रम भक्तनिवास | साईधर्मशाळा |
|---|---|---|---|
| ०१. | जानेवारी-२०२१ ते फेब्रुवारी -२०२१ | ७७,३०८.०० | ००.०० |
| ०२. | मार्च-२०२१ ते एप्रिल -२०२१ | ०० | ००.०० |
| ०३. | मे -२०२१ ते जुन -२०२१ | ०० | ००.०० |
| ०४. | जुलै -२०२१ ते ऑगस्ट -२०२१ | ०० | ००.०० |
| ०५. | संप्टेबर -२०२१ ते ऑक्टोंबर -२०२१ | ०० | ००.०० |
| | **एकूण रक्कम रुपये** | **७७,३०८.००** | **००.००** |

साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी जानेवारी-२०२१ ते फेब्रुवारी-२०२१ या कालावधीत एक फवारणीसाठी रु. ७७,३०८/- एवढा खर्च झालेला आहे. तसेच साई धर्मशाळा विभागात कोव्हीड केअर सेंटर असल्यामुळे एकही औषध फवारणी झाली नसल्याने कोणत्याही खर्च झालेला नाही.

विभागाचे स्पष्ट मत / अभिप्राय-

१) साईभक्तांना ढेकुण,डास,झुरळे इ.चा त्रास होऊ नये याकरीता संस्थानचे निवासस्थानामध्ये वेळोवेळी औषध फवारणी होणे गरजेचे असल्याने पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांचा कामाकालावधी दि.३१/१२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने सन २०२१-२२ मधील दि.०१/०१/२०२२ ते दि.३१/१२/२०२२ या कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस येत असून, आहे त्याच मंजुर दरात (रु. १.३५ पैसे मात्र प्रती चौ.फुट) व अटी शर्तीनुसार अधिन राहून दि.३१/०१/२०२२ पर्यंत अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ कार्यादेश सध्या कार्यरत असलेल्या पेस्ट कंट्रोल ठेकेदारांकडुन करणेकामी मुदतवाढ देणेस मान्यता मिळावी.

२) साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता दोन महिन्यातुन एक फवारणी करीता रु.७८,६९०/-(अक्षरी रु.अठ्याहत्तर हजार सहाशे नव्वद मात्र) तसेच साई धर्मशाळा विभागाकरीता दोन महिन्यातुन एक फवारणी करीता रु. २३,७१४.९२ (अक्षरी रु. तेवीस हजार सातशे चौदा रु. ब्यान्नव पै.) असे एकुण रु.१,०२,४०४.९२ (अक्षरी रु.एक लाख दोन हजार चारशे चार रु. ब्यान्नव पै. मात्र) GST वगळुन (१८%) एकत्रित खर्चास मान्यता मिळणेस.

सदर प्रस्तावीत केलेप्रमाणे अ.नं. ०१ व ०२ बाबींस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.३४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामासाठी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांना आहे त्याच मंजुर दरात व अटी शर्तीनुसार दि.३१/०१/२०२२ पर्यंत अथवा याकामी राबविणेत येत असलेली ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा)**

---

**विषय नं.०४** **संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल व कुशल कर्मचारी पुरविणेकामी नविन ठेकेदारांची नेमणूक होई पावेतो आहे त्या ठेकेदारांना मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ अखेर १ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे व मे.सुमीत फॅसेलिटीज लिमिटेड, पुणे या ०२ एजन्सीची ०.०००१% या सर्व्हीस चार्जेस दरावर नेमणूक करण्यात आलेली असून, त्यांना संस्थानचे विविध विभागांना अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचे कार्यादेश देण्यात आलेले असून, त्यांची मुदत दि.३१.१२.२०२१ रोजी संपुष्टात येत आहे.

पुढील कालावधीकरीता (दि.०१.०१.२०२२ ते दि.३१.१२.२०२२ करीता) अकुशल, कुशल व इतर कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नविन लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी मा.तदर्थ समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. याकामी मा.तदर्थ समिती सभा दि.३०.१०.२०२१, निर्णय क्र.२२१ अन्वये – आकृतीबंधानुसार पदसंख्या असल्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली. सध्याच्या लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक दि.३१.१२.२०२१ पर्यंत असल्याने आवश्यकता भासल्यास मुदतवाढीसाठीचा प्रस्ताव चक्रिय पध्दतीने सादर करावा. याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेत यावे. असा निर्णय झालेला असल्याने याकामी मा.तदर्थ समिती सभेच्या निर्णयानुसार विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेस कळविलेले असून, त्यावर कार्यवाही चालू आहे.

आता, मा.तदर्थ समिती सभा दि.३०.१०.२०२१ रोजीचे सभेतील निर्णयानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असून, याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून, दि.०२.१२.२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. पासून निविदा डाऊनलोडींग करणेकामी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतीम मुदत दि.२३.१२.२०२१ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत असून तांत्रीक निविदा दि.२७.१२.२०२१ रोजी उघडणेत येणार आहे. तांत्रीक निविदा उघडलेनंतर पात्र ठरत असलेल्या निविदा धारकांचे व्यवसायीक बीड खरेदी समिती सभेसमोर उघडणेत येईल.

विभागाचा अभिप्रायः- सध्या अकुशल/कुशल कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.१२.२०२१ रोजी संपुष्टात येणार आहे. तसेच याबाबत मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन अद्याप पर्यंत मंजूर झालेले नसून अद्याप निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो तसेच मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन मंजूर होईपावेतो आहे तेच ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सुमीत फॅसेलिटीज लिमिटेड, पुणे यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील आहे त्याच अटी व शर्तीवर मुदतवाढ द्यावी लागेल.

सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल व कुशल कर्मचारी पुरविणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सुमीत फॅसेलिटीज लिमिटेड, पुणे यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील आहे त्याच अटी व शर्तीनुसार दि.३१.०१.२०२२ पर्यंत अथवा नवीन ठेकेदाराची नियुक्ती करणेकामी राबविणेत येत असलेली ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नवीन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ मिळणेबाबत मा.अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांचेकडील जा.क्रं. डी - ४७/ इमारत/शिर्डी/भाडे करारनामा/२०२०-२१ दि.२०/०९/२०२१.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद**–श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) प्रमाणे विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता,राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना**–मा.अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.४/३ मधील साईउद्यान इमारतीतील १५९९.४१ चौ.फूट जागा शिर्डी पोस्ट ऑफीसकरीता यापूर्वी खालील तक्त्यात नमूद केलेल्या कालावधीसाठी वापरास देणेत आलेली आहे.

| अ.नं. | मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेचा दिनांक व ठराव | करारनामा केलेचा कालावधी |
|---|---|---|
| १ | दि.१३/१२/२००३ निर्णय क्रं.५९० | दि.१८/१२/२००३ ते दि.१७/११/२००४ |
| २ | दि.२७/१२/२००४ निर्णय क्रं.१६६ | दि.१८/११/२००४ ते दि.१७/१०/२००५ |
| ३ | दि.१४/१२/२००५ निर्णय क्रं.७७० | दि.१८/१०/२००५ ते दि.१७/१०/२०१० |
| ४ | दि.२६/०३/२०११ निर्णय क्रं.२३९ | दि.१८/१०/२०१० ते दि.१६/१०/२०११ |
| ५ | दि.२४/०९/२०११ निर्णय क्रं.७३४ | दि.१७/१०/२०११ ते दि.१६/१०/२०१२ |
| ६ | दि.२६/०२/२०१३ निर्णय क्रं.१७९,मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लिकेशन नं.९४२२/०१३ मधील दि.१३/०८/२०१३ रोजीचा आदेश | दि.१७/१०/२०१२ ते दि.१६/१०/२०१३ |
| ७ | दि.०५/०६/२०१४ निर्णय क्रं.४३२,मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लिकेशन नं.१०४२९/२०१४ मधील दि.२२/१२/२०१४ रोजीचा आदेश | दि.१७/१०/२०१३ ते दि.१६/१०/२०१४ |
| ८ | दि.३०/११/२०१६ निर्णय क्रं.७६५ | दि.१७/१०/२०१४ ते दि.१६/१०/२०१५<br>दि.१७/१०/२०१५ ते दि.१६/१०/२०१६<br>दि.१७/१०/२०१६ ते दि.१६/१०/२०१७ |
| ९ | दि.०८/१२/२०१७ निर्णय क्रं.१०४४ | दि.१७/१०/२०१७ ते दि.१६/१०/२०१८ |
| १० | दि.१३/१२/२०१८ निर्णय क्रं.७३६ | दि.१७/१०/२०१८ ते दि.१६/१०/२०१९ |
| ११ | दि.०४/१२/२०१९ निर्णय क्रं.५०३ | दि.१७/१०/२०१९ ते दि.१६/१०/२०२० |
| १२ | दि.२०/११/२०२० मा.तदर्थ समितीने चक्रीय पध्दतीने मान्यता. | दि.१७/१०/२०२० ते दि.१६/१०/२०२१ |

पोस्ट ऑफीससाठी वापरास दिलेल्या उपरोक्त जागा वापराची मुदत दि.१६/१०/२०२१ रोजी संपत असल्याने मा. अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.डी-४७/इमारत/शिर्डी/ भाडे/ करारनामा/ २०२०-२१ दि.२०/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त जागा वापराची पुढील मुदत दि.१७/१०/२०२१ ते दि.१६/१०/२०२२ या एक वर्ष कालावधी साठीची मुदतवाढ मिळणेकामी व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेकामी इकडेस विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** मा.अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांचे उपरोक्त दि.२०/०९/२०२१ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने पोस्ट ऑफीस,शिर्डीसाठी वापरास दिलेली मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीची जमीन स.नं.४/३ मधील नगरपंचायत मिळकत नं.५०४ पै. साईउद्यान इमारतीतील दोन हॉल (१५९९.४१ चौ.फूट) इतकी जागा वापराची पुढील मुदत दि.१७/१०/२०२१ ते दि.१६/१०/२०२२ या एक वर्षे कालावधीसाठी FRAC ने निश्चित केलेप्रमाणे दरमहा भाडे रक्कम रु.१२,३८५/- इतके व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने वापरास मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

तसेच उक्त जागा वापराचे FRAC ने निश्चित केलेले मासिक भाडे रक्कम रु.१२,३८५/- इतके सन २०१४ पासून आकारण्यात आलेले आहे. म्हणजेच सदर भाडेदर निश्चित होवून सुमारे ७ वर्षांचा कालावधी झालेला आहे. मात्र सदर भाडेदरात कोणतीही वाढ केलेली नाही. यास्तव पुढील कालावधीसाठी उक्त जागा वापराचे मासिक भाडे रक्कम रु.२५,०००/- इतके निश्चित करता येईल व त्याप्रमाणे पोस्ट विभागाकडे मागणी करता येईल.

**प्रस्ताव** – मा.अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर यांचे उपरोक्त दि.२०/०९/२०२१ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने पोस्ट ऑफीस, शिर्डी साठी वापरास दिलेली मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीची जमीन स.नं.४/३ मधील नगरपंचायत मिळकत नं.५०४ पै. साईउद्यान इमारतीतील दोन हॉल (१५९९.४१ चौ.फूट) इतकी जागा वापराची पुढील मुदत दि.१७/१०/२०२१ ते दि.१६/१०/२०२२ या एक वर्षे कालावधीसाठी FRAC ने निश्चित केलेप्रमाणेचे दरमहा भाडे रक्कम रु.१२,३८५/- इतके व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने वापरास मुदतवाढ देणेच्या व पूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ तसेच उक्त जागा वापराचे FRAC ने निश्चित केलेले मासिक भाडे रक्कम रु.१२,३८५/- इतके सन २०१४ पासून आकारण्यात आलेले आहे. म्हणजेच सदर भाडेदर निश्चित होवून सुमारे ७ वर्षांचा कालावधी झालेला आहे. मात्र सदर भाडेदरात कोणतीही वाढ केलेली नाही. यास्तव पुढील कालावधीसाठी उक्त जागा वापराचे मासिक भाडे रक्कम रु.२५,०००/- इतके निश्चित करणेच्या व त्याप्रमाणे भाडे पोस्ट विभागाकडे मागणी करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४२** **यावर सविस्तर चर्चा झाली, शिर्डी पोस्ट ऑफीस करीता वापरास दिलेल्या जागेचे भाडे FRAC ने निश्चित केलेल्या मासिक भाडेदरानुसार रक्कम रु.१२,३८५/-मात्र सन २०१४ पासून आकारण्यात येते. सदर भाडेदराची रक्कम निश्चित होऊन सुमारे ७ वर्षांचा कालावधी झालेला आहे. मात्र सदर भाडेदरात कोणतीही वाढ केलेली नाही. त्यामुळे मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीची जमीन स.नं.४/३ मधील नगरपंचायत मिळकत नं.५०४ पै. साईउद्यान इमारतीतील दोन हॉल (१५९९.४१ चौ.फूट इतकी जागा) शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरासाठी मासिक भाडे रक्कम रु.२५,०००/-इतके व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने दि.१७/१०/२०२१ ते दि.१६/१०/२०२२ या एक वर्षे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच याकामी पूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०६** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत चालवत असलेल्या मोफत बॅग क्लोकरुम,पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम,प्रसाद व दुध स्टॉल इ.व्यवसायासाठी वापरात असलेल्या जागा वापराची पुढील मुदत वाढवून मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/५०/२०२१ दि.२१/०६/२०२१ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना खालील तक्त्यात नमुद केलेल्या व्यवसायासाठी व ठिकाणी वापरास दिलेल्या जागा वापरास दि.०१/१०/२०२० ते दि.३१/०८/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी मागील वर्षीच्या भाडेदरात १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम

रु.११,७९०/-+१०% रु.१,१७९/- अशी एकूण दरमहा प्रति स्टॉल रक्कम रु.१२,९६९/- इतकी म्हणजेच एकुण ६ स्टॉलची होणारी मासिक रक्कम रु.७७,८१४/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्यास व पुर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेण्यास संस्थानचे मा.तदर्थ समितीने दि.१७/०५/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेली आहे.

त्याप्रमाणेचा करारनामा दि.१०/०६/२०२१ रोजी अलाहिदा करणेत आलेला आहे. सदर करारनाम्याची मुदत दि.३१/०८/२०२१ रोजी संपुष्टात आली असल्याने मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/५०/२०२१ दि.२१/०६/२०२१ अन्वये पुढील दि.०१/०९/२०२१ ते दि.३१/०७/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी उक्त जागा वापरास मुदतवाढ मिळणेकामी इकडेस विनंती केलेली आहे.

| अ.नं. | व्यवसायाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १ | क्लोकरुम | सुलभ शौचालय इमारतीमध्ये |
| २ | प्रसाद स्टोअर | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालयाजवळ) |
| ३ | दुध स्टॉल | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालयाजवळ) |
| ४ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | साईउद्यान परिसर |
| ५ | पादत्राणेगृह | साईप्रसाद नं.२ परिसर |
| ६ | पादत्राणेगृह | साईउद्यान परिसर |

**विभागाचा अभिप्राय-** मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसा. लि.शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.२१/०६/२०२१ रोजीचे पत्रातील विनंतीप्रमाणे वापरास दिलेल्या जागेच्या वापराची पुढील मुदत दि.०१/०९/२०२१ ते दि.३१/०७/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी मागील वर्षीच्या भाडेदरात १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१२,९६९/-+ १०% रु.१,२९७/- अशी एकूण दरमहा प्रति स्टॉल रक्कम रु.१४,२६६/- इतकी म्हणजेच एकुण ६ स्टॉलची होणारी मासिक भाडे रक्कम रु.८५,५९६/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्यास व पूर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत चालविणेत येत असलेल्या उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या सहा ठिकाणचे व्यवसायास जागा वापराची पुढील मुदत दि.०१/०९/२०२१ ते दि.३१/०७/२०२२ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी पूर्वीच्या भाडेदरात १०% इतकी वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१२,९६९/-+१०% रु.१,२९७/- अशी एकूण दरमहा प्रति स्टॉल रक्कम रु.१४,२६६/- इतकी आकारुन म्हणजेच एकूण ६ स्टॉलची होणारी मासिक भाडे रक्कम रु.८५,५९६/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पुर्वीच्याच अटी व शर्तीवर मुदतवाढ देणेच्या व पुर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४३** **यावर सविस्तर चर्चा झाली, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना व्यवसायासाठी जागा/गाळे वापरास दिलेले आहेत, त्यामध्ये प्रसाद तसेच दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवले जातात. त्याची गुणवत्ता व दर्जा याची तपासणी केली जात नाही. साईभक्त संस्थानचे स्टॉल समजून खरेदी करतात. त्यासाठी सोसायटीला जागा/गाळे उपलब्ध करुन देणेकामी अटी/शर्ती ठरविण्यात याव्यात. सोसायटीचे पदाधिकारी यांना मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेसमोर चर्चेसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.**

**उपरोक्त प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या ठिकाणच्या संस्थान मालकीची जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना क्लोकरुम, प्रसाद स्टोअर, दुध स्टॉल, मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व पादत्राणेगृह इत्यादी व्यवसायासाठी पूर्वीच्या भाडेदरात १०% इतकी वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१२,९६९/-+१०% रु.१,२९७/- अशी एकूण दरमहा प्रति स्टॉल रक्कम रु.१४,२६६/- इतकी आकारुन एकूण ६ स्टॉलची होणारी मासिक भाडे रक्कम रु.८५,५९६/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार दि.०१/०९/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व याकामी पुर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०७** **गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम चालविणेस श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना मुदतवाढ देणेबाबत मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील जा.नं.श्री सासंएक्रसो/२१५/२०२१ दि.१५/११/२०२१ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना-** मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त पत्र जा.नं.श्री सासंएक्रसो/२१५/२०२१ दि.१५/११/२०२१ अन्वये, "संस्था श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर काम करत असलेल्या कायम कर्मचा-यांची नोंदणीकृत सहकारी संस्था असुन संस्था संस्थेच्या सभासदांना कर्ज पुरवठयाबरोबरच संस्थान परिसरात संस्थान मान्यतेने श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी मोफत पादत्राणेगृह व बॅग क्लोकरुम सुविधा चालवत आहे. त्याचप्रमाणे मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवस्था,प्रसाद विक्री स्टोअर,नॉव्हेल्टी स्टोअर,दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टोअर,शालेय साहित्य विक्री केंद्र चालवत असुन त्या माध्यमातून श्री साईभक्तांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना वाजवी दरात चांगली सेवा पुरवित आहे. संस्थेस सदर व्यवसायांचे माध्यमातून मिळणा-या उत्पन्नातून संस्था संस्थेच्या सभासदांना म्हणजेच संस्थान कर्मचा-यांना कमी व्याजदराने कर्जपुरवठयाबरोबरच अनेक सुविधा पुरवत आहे. त्यामुळे संस्था ही संस्थान कर्मचा-यांची कामधेनू ठरत आहे.

संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी गुरुस्थान मंदिराचे दक्षिण बाजुस चालवत असलेले मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी जागा वापराची मुदत दि.०६/१२/२०२१ रोजी पुर्ण होत असुन संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सदर मोबाईल कमेरा क्लोकरुम व्यवसायासाठी जागा वापरास दि.०७/१२/२०२१ ते दि.०६/११/२०२२ या ११ महिन्यांसाठी मुदतवाढ मिळावी," असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

यापूर्वी साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२०, नगरपंचायत मिळकत नं.७०६ मधील एक गाळा क्षेत्र ३७.७० चौ.फूट इतकी जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी पूर्वीचेच अटी व शर्तीस अधीन राहून तसेच मागील कालावधीचे मासिक भाडेमध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.११,४१४/- + १०% रु.१,१४१/- अशी एकूण रक्कम रु.१२,५५५/- इतके मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन उक्त सोसायटीस पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.०७/०१/२०२१ ते दि.०६/१२/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ देणेस व पूर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेणेस संस्थानचे मा.तदर्थ समितीने दि.१७/०५/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेली आहे.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचेकडून उक्त कालावधीसाठीचा करारनामा दि.१०/०६/२०२१ रोजी नोटराईज करुन घेणेत आलेला आहे. सदर करारनाम्याची मुदत दि.०६/१२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील दि.०७/१२/२०२१ ते दि.०६/११/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेकामी मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.१५/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये इकडेस विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.१५/११/२०२१ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२०, नगरपंचायत मिळकत नं.७०६ मधील बांधीव क्षेत्र ३७.७० चौ.फूट इतकी जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी पूर्वीचेच अटी व शर्तीस अधीन राहून तसेच मागील कालावधीचे मासिक भाडे रक्कम रु.१२,५५५/- मध्ये १०% इतकी वाढ करुन म्हणजेच रु.१२,५५५/- + १०% रु.१,२५६/- अशी एकुण रक्कम

रु.१३,८११/- (अक्षरी रु.तेरा हजार आठशे अकरा मात्र) इतके मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर दि.०७/१२/२०२१ ते दि.०६/११/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ देता येईल व पूर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

**प्रस्ताव-** मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.१५/११/२०२१ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२०, नगरपंचायत मिळकत नं.७०६ मधील बांधीव क्षेत्र ३७.७० चौ.फूट इतकी जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी पूर्वीचेच अटी व शर्तीस अधीन राहून तसेच मागील कालावधीचे मासिक भाडे रक्कम रु.१२,५५५/- मध्ये १०% इतकी वाढ करुन म्हणजेच रु.१२,५५५/- + १०% रु.१,२५६/- अशी एकुण रक्कम रु.१३,८११/- (अक्षरी रु.तेरा हजार आठशे अकरा मात्र) इतके मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर दि.०७/१२/२०२१ ते दि.०६/११/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ देणेच्या व पूर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४४** **यावर सविस्तर चर्चा झाली, प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त निर्णय क्र.३४३ नुसार सोसायटीचे पदाधिकारी यांना मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेसमोर चर्चेसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२०, नगरपंचायत मिळकत नं.७०६ मधील बांधीव क्षेत्र ३७.७० चौ.फूट इतकी जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी मागील कालावधीचे मासिक भाडे रक्कम रु.१२,५५५/- मध्ये १०% इतकी वाढ करुन म्हणजेच रु.१२,५५५/-+१०% रु.१,२५६/- अशी एकुण रक्कम रु.१३,८११/- (अक्षरी रु.तेरा हजार आठशे अकरा मात्र) इतके मासिक भाडे आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीनुसार दि.०७/१२/२०२१ ते दि.०६/०३/२०२२ या तीन महिने कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ देण्यास व याकामी पूर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०८** **संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२२ मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

संस्थान व्यवस्थापनाने तयार केलेले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) भक्त मंडळ विनियम सन २०१३ मध्ये शासनाने मान्य केलेले आहेत. या विनियमातील कलम (४) भक्त मंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार यामध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

१. भक्तमंडळांच्या सभासदांना संस्थानच्या तीन उत्सवाचे, म्हणजे रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवांचे निमंत्रण पाठविण्यात येईल. असे निमंत्रण डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने, फॅक्स, ई-मेल व्दारा किंवा इलेक्ट्रॉनीक संपर्काच्या इतर पध्दतीने पाठविण्यात येईल.

२. वर उल्लेख केलेल्या तीन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने 'उदी प्रसाद' प्राप्त होण्यास पात्र असेल.

**प्रस्तावना:-** संस्थानमार्फत साज-या होणा-या वर्षभरातील तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका संस्थानचे भक्तमंडळाच्या सभासदांना पाठविणेकामी खालील दोन भागात कार्यवाही केली जाते.

**अ)**

१) मंदिराकडून उत्सवाची माहिती मागविणे.

२) ई-निविदा मागविणेकामी मसुदा तयार करणे.

३) सदरचा मसुदा वरिष्ठांकडुन तपासुन मान्य करुन घेणे.

४) वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे.

५) ई निविदा भरणेकामी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देणे.

६) ई-निविदेचा कालावधी संपल्यानंतर मा. खरेदी समितीचे सभेपुढे तांत्रिक बिड (Technical Bid) उघडणे.

७) तांत्रिक बिड उघडल्यानंतर पात्र छपाईधारकांचे दरपत्रक (Commercial Bid) मा. खरेदी समिती सभेपुढे उघडुन तुलनात्मक तक्ता तयार करुन सादर करणे.

८) निम्नतम दर असलेल्या छपाईधारकास दराबद्दल चर्चा/वाटाघाटीसाठी प्रत्यक्ष मा. तदर्थ समितीचे सभेत उपस्थित राहणेबाबत कळविणे.

९) वाटाघाटी / चर्चेअंती निम्नतम दर निश्चित करणे.

**ब)**

१) छपाईधारकास छपाई कामाचा कार्यादेश देणे.

२) तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाईकामी निम्नतम छपाईधारकाकडून छपाईकामाचा करारनामा तयार करुन घेणे.

३) प्रत्येक उत्सवाच्या निमंत्रण पत्रिकेचा मसुदा व रंगसंगती वरिष्ठांकडुन मान्य करुन घेणे.

४) रंगसंगती निश्चित झाल्यानंतर छपाई कामास सुरवात करणेबाबत कळविणे .

५) पाकीटे व पत्ते चिटकविणे, फ्रॅंकिग करणे.

६) पत्रिकांची राज्याच्या नावानुसार विभागणी करुन पोष्टात टाकणे.

भक्त मंडळ विनियम सन २०१३ मधील कलम (४) नुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत साज-या करणेत येणा-या श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी (विजयादशमी) उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद भक्तमंडळ सभासदांना पोष्टाव्दारे पाठविणेत येतो. सध्या १,८०,००० इतके संस्थान भक्तमंडळाचे सभासद असून, सभासद संख्येत वाढ किंवा घट होऊ शकते. तसेच व्यवस्थापनामार्फत देणगीदार भक्त, मा. मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मान्यवर अधिकारी व शिर्डी ग्रामस्थ यांना निमंत्रण पाठविण्यात येतात.

भक्तमंडळाच्या सभासदत्वापोटी (कायम निधी- Permanent Fund) दि.३१.०३.२०२१ अखेर रक्कम रुपये ३३,५४,३०,८०७/- एवढी व्याजासह जमा आहे. साईभक्त सभासदांना उत्सवाच्या ज्या निमंत्रण पत्रिका पाठवल्या जातात त्यांचा छपाईपासून त्या पोस्टात पडेपर्यंतचा सर्व खर्च या व्याजातूनच वळता होत असल्याने त्यासाठी संस्थानच्या तिजोरीतून कुठलीही वेगळी किंवा जास्तीची रक्कम खर्च होत नाही. तसेच या निमंत्रण पत्रिकेच्या पाकीटातूनच ‘उदीप्रसाद’ पाठविला जातो कारण तशी तरतुद आहे व ‘उदीप्रसादाशी’ भक्तांच्या धार्मिक भावना जोडलेल्या आहेत.

संस्थानमार्फत सन २०१९ मध्ये तीनही उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका छपाई करण्यात आल्या होत्या त्याकामी रक्कम रु.११,८५,४०८/- मात्र एवढा खर्च आला आहे. सन २०२० ते २०२१ या कालावधीत कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव असल्यामुळे तीनही उत्सव साध्या पध्दतीने साजरे करण्यात आले. उत्सवाच्या निमंत्रणपत्रिकांची छपाई करण्यात आली नाही.

सन २०२२ मध्ये साजरा करण्यात येणा-या तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका खालील तपशीलाप्रमाणे छपाई करणे आहे.

**<u>निमंत्रण पत्रिका</u>**

| निमंत्रण पत्रिका छपाई तपशिल | प्रती उत्सव छपाई संख्या १,८०,००० प्रमाणे तीनही उत्सवांची छपाई संख्या |
|---|---|
| अ) निमंत्रण पत्रिका- फोर कलर छपाई<br>आकार-९.५" x९.५"<br>कागदाचा प्रकार १२० GSM आर्ट पेपर<br>ब) पाकीटे (फोर कलर) आकार -५" x १०"<br>९० GSM आर्ट पेपर<br>क) पत्रिका घडी करुन पाकीटात भरणे पाकीटांसाठी गमटेप वापरणे. | ५,४०,००० |

**विभागाचा अभिप्राय:-** सध्या भारतात व महाराष्ट्रात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव अतिशय कमी झालेला असुन, भारतातील व महाराष्ट्रातील मंदिरे स्थानिक राज्य सरकारच्या आदेशाने भाविकांना दर्शनासाठी खुली केली आहेत. श्री साईबाबांचे मंदिरही राज्य सरकारच्या आदेशाने खुले करण्यात आले आहे. त्यामुळे भक्तांचा दर्शनासाठी चांगल्या प्रकारे प्रतिसादही मिळत आहे व संस्थाननेही आता पूर्वीपेक्षा जादा साईभक्तांना दर्शनासाठी सोडण्याची कार्यवाही सुरु केली आहे श्री रामनवमी उत्सव हा एप्रिल महिन्यात असल्याने तोपर्यंत कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आणखी कमी होईल त्याचप्रमाणे या रोगावरची लसही उपलब्ध आहे. त्यामुळे सन २०२२ मधील तीनही उत्सव नियमितपणे पार पडतील अशी अशा आहे. सबब तीनही उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका छापून घेणे क्रमप्राप्त ठरेल.

तीनही उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका छापून घ्यावयाच्या ठरल्यास छपाईकामी ई-निविदेसाठी जाहिरात देणे, ई-निविदा मागविणे, ई-निविदा उघडणे, वाटाघाटीसाठी मा. तदर्थ समितीचे सभेसमोर निमंत्रीत करणे, इतिवृत्त प्राप्त होणे, छपाईधारकास छपाई कामाचा कार्यादेश देणे, निमंत्रणपत्रिकेचा मजकूर देणे, निमंत्रण पत्रिकेचे नमुणे तयार करणे, प्रूफ तपासणे, त्यानंतर मान्य होणे व प्रेसधारकाकडून पुरवठा होणे, भक्त मंडळ सभासदास पाठविणे अशा कामास ६० ते ७० दिवसांचा कालावधी लागेल. तसेच निमंत्रण पत्रिका छपाईसाठी लागणा-या पेपरच्या दरात दिवसेनदिवस वाढ होत असल्याने उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी अंदाजे रक्कम रु.१७,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सतरा लाख) मात्र खर्च येईल असे नम्र मत आहे.

**प्रस्ताव:-** तरी सन-२०२२ मधील संस्थानमार्फत साज-या करण्यात येणा-या उत्सवांसाठी उपरोक्तप्रमाणे नमुद केलेल्या निमंत्रण पत्रिका छापून घेणेसाठी पत्रिका व पाकीटे छपाई करणेकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस, जाहिरातीनुसार आलेल्या ई-निविदेबाबत पुढील कार्यवाही करुन निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१७,००,०००/- (अक्षरी- रुपये सतरा लाख) मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०२२ मधील संस्थानमार्फत साज-या करण्यात येणा-या उत्सवांसाठी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे निमंत्रण पत्रिका व पाकीटे छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१७,००,०००/-मात्रचे खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या विषयावरील निर्णय वाचून कायम करणे.**

१. **आयकर कायद्यातील तरतूदींन्वये सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांस सर्व माध्यमाद्वारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(C)(V) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारीत तरतूद पुढीलप्रमाणे आहेत.

"Provided also that the fund of trust or institution [or any university or other educational institution or any hospital or other medical institution] referred to in sub-clause (iv) or sub-clause (v) [or sub-clause (vi) or sub-clause (VIA)]

d) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते खर्च न झाल्यास या ८५% उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पुर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायद्यातील तरतुदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागु असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

संस्थानचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करावयाचे आहे. सदर आयकर विवरणासोबत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल याबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक असते. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या अखर्चित उत्पन्नाचा पुढील पाच वर्षात खर्चाच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा खालीलप्रमाणे प्रस्तावित केला आहे :-

*(रुपये कोटीमध्ये)*

| अ.नं. | तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | मंदिराची विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे, स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे, देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे. | ५० |
| २ | भक्तांना प्रसाद भोजन देणे आणि अन्नछत्र चालविणे, पाणी योजनेकरिता. | ५० |
| ३ | भक्तांना दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोई व सुविधा पुरविणे, दर्शन सुविधा. | ५० |
| ४ | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी भक्तनिवास, विश्रामगृहे बांधणे, त्याची दुरुस्ती देखभाल करणे, भक्तांकरिता साईसिटी प्रकल्प निर्मिती. | ५० |
| ५ | शासन मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, सोसायटी यांचे शैक्षणिक संस्था, क्रिडा, संस्था वाचनालय, रुग्णालय सेवा, निराश्रित अथवा शारीरीकदृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला व साहित्य क्षेत्राशी संबधीत असलेली संस्था, कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेणे, शैक्षणिक संकुल. | १०० |
| ६ | स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी, संस्थानच्या सोईमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करणे. | ५० |
| ७ | भक्तांच्या-जनतेच्या सोयीसाठी संस्थानच्या २५ कि.मी. परिसरातील रस्त्यांची कामे करणे. | २५ |
| ८ | मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवता आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देणे. | ५० |
| ९ | संस्थानच्या वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुदीत नमुद केलेनुसार संस्थानचे नियोजीत उद्दीष्टांवर खर्च करणे. | २५ |
| | **एकुण :-** | ४५० |

तरी संस्थानचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्याकरीता सन २०२०-२१ चे अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करण्याच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा सोबत जोडून आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्याची अंतिम तारीख दि.३१.१२.२०२१ अशी आहे.

**विभागाचा अभिप्राय :-** संस्थानचे आयकर विवरणपत्र वेळेत दि.३१.१२.२०२१ अखेर दाखल झाले नाही तर, धर्मादाय व धार्मिक ट्रस्ट म्हणून संस्थानला असलेल्या आयकर सवलती मिळणार नाहीत. तसेच आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील अखर्चित उत्पन्नावर महत्तम दराने आयकर आकारणीची तरतूद आहे.

तरी आयकर कायद्यातील तरतूदींन्वये सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.३४६/१ आयकर कायद्यातील तरतूदींन्वये सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत चक्रिय पध्दतीने प्रस्ताव निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**२. आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेवुन शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम-२००४ संस्थानसाठी लागु केला असुन, त्या अनुसार संस्थानचे कामकाज सुरु आहे. अधिनियम-२००४ मध्ये **कलम १७(२)(ग)** मधील तरतुदीनुसार, "विश्वस्तव्यवस्थेच्या हिशोबाची, राज्यशासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगतवर्षातील अशा तारखेपर्यत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील. व **कलम २९(१)** मधील तरतुदीनुसार समिती, त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणाऱ्या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षणाचा अहवाल, तसेच ज्यांना विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक साहाय्य देण्यात आले अशा देणगी स्वीकारणाऱ्या संस्थांची (संपुर्ण पत्त्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक साहाय्य मागण्यामागील उददेश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवुन घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्ताला, त्या वर्षाच्या ३० सप्टेंबरच्या आत सादर करील '' अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र राज्य विधी व न्याय विभाग यांनी क्र.सासंवि-१०२१/२६०/प्र.क्र.८३/का.१६ दि.२९.०६.२०२१ अन्वये मे.के.के.चाणाणी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, मुंबई, यांची सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करण्यास मान्यता दिली होती. उपरोक्त मान्यतेस अनुसरुन जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/अंलेप/१२२७/२०२१ दि.१२.०७.२०२१ रोजीचे पत्रान्वये त्यांना कार्यादेश देण्यात आला होता. कार्यादेशास अनुसरुन त्यांनी आर्थिक वर्ष २०२०-२१ चे वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण केले असुन, वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची प्रत दि.१८.१२.२०२१ रोजी संस्थानला सादर केली आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन सदर अहवालाची नोंद घेऊन त्याची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्तांना सादर करणे आवश्यक आहे. अहवालात निदर्शनास आणुन दिलेल्या दोष/अपुर्ततांची दोष दुरूस्ती संबंधीत विभागांकडून करुन दोष दुरुस्ती अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येईल. संस्थान अधिनियम-२००४ मधील कलम २९(२) नुसार दरवर्षी संस्थानचा वार्षिक अहवाल (प्रशासकीय अहवाल व लेखापरिक्षण अहवाल) प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधी मंडळासमोर ठेवणे बंधनकारक आहे. तसेच संस्थानचे आयकर विवरणपत्र दाखल करण्याची अंतिम तारीख दि.३१.१२.२०२१ अशी आहे, त्याकरिता आयकर सल्लागार यांचेमार्फत आयकर विवरणपत्राची तयारी करणे आवश्यक आहे.

तरी शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे. के.के. चानाणी ॲन्ड कं.,चार्टर्ड अकौटंटस्, मुंबई यांनी दि.१८.१२.२०२१ रोजी सादर केलेल्या आर्थिक वर्ष २०२०-२१ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेणेस व त्याची एक प्रत राज्य शासनास विधीमंडळाच्या अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवणेकामी व एक प्रत धर्मादाय आयुक्त कार्यालय, मुंबई यांना सादर करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.३४६/२ आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत चक्रिय पध्दतीने प्रस्ताव निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **संस्थानमधील कायम कर्मचा-यांना The Payment of Gratuity Act,1972 च्या तरतुदीनुसार उपदानाची (Gratuity) रक्कम अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम-२००४ मधील कलम (१६) नियत दिवसाच्या लगतपूर्वी, जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवच्या त्याच इतर अटी शर्ती व शर्तीवर, नियत दिवसापासून, समितीच्या यंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजाशी संबंधीत अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल; आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज अहीत होईल, अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.

कलम २८(१) कार्यकारी अधिकारी किंवा समिती त्यांच्या कोणत्याही कार्यवाहीचे किंवा निर्णयाचे किंवा आदेशाचे अभिलेख हे, अशा कार्यवाहीचा कायदेशिरपणा किंवा त्याखाली दिलेल्या निर्णयाचा अथवा आदेशाचा बिनचुकपणा, कायदेशीरपणा किंवा औचित्य याबाबत स्वत:ची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने मागवून घेणे व त्याची तपासणी करणे आवश्यक व इष्ट आहे, असे राज्य शासनास वाटल्यास, त्यास तसे करता येईल आणी कोणत्याही बाबतीत असा कोणताही निर्णय किंवा आदेश यात फेरबदल, विलोपन किंवा प्रत्यावर्तन केले पाहिजे किंवा तो फेरविचारार्थ पाठविला पाहिजे, असे राज्य शासनास अढळुन आले तर, राज्य शासनास, त्याप्रमाणे आदेश काढता येईल.''तसेच''संबंधित पक्षकारांना स्पष्टीकरण देण्याची संधी देण्यात आल्याशिवाय राज्य शासन, पोट कलम (१) अन्वये कोणताही आदेश देणार नाही.

**<u>मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांचा दि.१६/०४/१९६६ चा आदेश-</u>**

उपरोक्त आदेशान्वये संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या सेवेच्या प्रत्येक वर्षाच्या १५ दिवस इतकी ग्रॅच्युईटी देणेबाबत निर्देशित केले आहे.

**<u>मा.कामगार आयुक्त, नाशिक यांचे दि.२/१२/१९९२ रोजीचे पत्र:</u>**

''आपल्या संस्थेतील कामगार/कर्मचा-यांच्या सेवाशर्ती महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ च्या तरतूदीप्रमाणे असतील व त्यांचे सर्व दृष्टया काटेकोरपणे पालन करण्यात येत असेल तर संस्थानच्या कर्मचा-यांना शासकीय नियमानुसार ग्रॅच्युईटी देता येईल. अन्यथा संस्थान कर्मचा-यांना The Payment of Gratuity Act 1972च्या तरतूदीनुसार ग्रॅच्युईटी देण्यात यावी''

**<u>मा.कामगार आयुक्त, नाशिक यांचे दि.१८/०१/१९९३ रोजीचे पत्र:</u>**

''जर संस्थान कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ च्या तरतुदी पूर्णपणे लागू नसतील तर त्यांना पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट, १९७२ च्या तरतूदीनुसार ग्रॅच्युईटी द्यावी. सदर अधिनियमाच्या कलम २ (एस) मध्ये वेतनाची व्याख्या दिली असून त्यानुसार वेतनाचे संज्ञेत महागाई भत्त्याचा समावेश होतो असे स्पष्ट लिहीले असून त्यामुळे संस्थान कर्मचा-यांना ग्रॅच्युईटी देताना वेतनाचे संज्ञेत महागाई भत्ता धरुन ग्रॅच्युईटी काढावी असे या कार्यालयाचे मत आहे''

**मा.व्यवस्थापन /मा.तदर्थ समितीचे सभेतील निर्णय:**

**<u>दि.२२-२३/०९/२००१ रोजीच्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील निर्णय क्र.४१८-</u>**

एखाद्या कर्मचा-याचे सेवानिवृत्त होण्यापूर्वीच अकस्मात निधन झाल्यास त्या कर्मचा-याला त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंतची उपदानाची रक्कम मिळावी व त्याच्या वारसांना मदत व्हावी या हेतूने दि.२२-२३/०९/२००१ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील निर्णय क्र.४१८ अन्वये संस्थानच्या कायम कर्मचा-यांसाठी एल.आय.सी.पुणे यांचेकडुन ग्रुप ग्रॅच्युईटी योजना The Payment of Gratuity Act 1972 च्या तरतूदीनुसार लागु करण्यात आलेली आहे.

**दि.०४/०७/२०१० रोजीच्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील निर्णय क्र.५५४-**

*"प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे The Payment of Gratuity Act 1972 मध्ये झालेल्या सुधारेणप्रमाणे कर्मचा-यांना द्यावी लागणारी उपदानाची कमाल मर्यादा रु.१० लक्ष पर्यंत मात्र वाढविण्यात आल्यामुळे दि.२४ मे २०१० पासून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना या कायद्यानुसार उपदान आदा करावी असे ठरले"*

**दि.१३/१२/२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील निर्णय क्र.७३१-**

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, The Payment of Gratuity Act 1972 मध्ये झालेल्या सुधारेणप्रमाणे कर्मचा-यांना द्यावी लागणारी उपदानाची कमाल मर्यादा रु.२० लक्ष पावेतो वाढविण्यात आलेली असल्याने, दि.२९ मार्च २०१८ नंतर संस्थान सेवेतून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना या कायद्यानुसार ग्रॅच्युईटी रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली. व त्याप्रमाणे शासनास कळविण्यात यावे"*

**दि.२८/०८/२०२० रोजीच्या मा.तदर्थ सिमतीच्या सभेतील निर्णय क्र.४२४.**

*"महाराष्ट्र शासनाने पत्र क्र.माआअ-१०१९/प्र.क्र.१३/का-१६, दि.०९ जुलै २०२० चे पत्रान्वये उपदानाची रक्कम २० लक्षपर्यंत वाढविण्याचा संस्थानने महाराष्ट्र शासनाला पाठविलेला प्रस्ताव अमान्य केलेला असल्याने सदरहु शासन निर्णयाचे विरोधात जावून उपदानाच्या रकमेत अशी वाढ करता येणार नाही असे समितीने एकमताने ठरवले. सबब, सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. सदरचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन करून मान्यता घेण्यात यावी"*

**दि.२९/१२/२०२० रोजीच्या मा.तदर्थ समितीच्या सभेतील निर्णय क्र.४५४.**

*"संस्थानमधील कायम कर्मचा-यांना कोर्ट रिसिव्हरच्या काळापासून म्हणजे, दि.१६.०४.१९६६ पासून The Payment of Gratuity Act, 1972 मधील तरतुदीनुसार उपदान अदा करण्यात येते. संस्थानने त्यासाठी एल.आय.सी.सोबत एक योजना तयार करून त्यामध्ये दरवर्षी अंशदान जमा करण्यात येते. जमा रकमेवार एल.आय.सी.व्याजही देते. मयत कर्मचा-याच्या वारसांना कर्मचा-यांची उर्वरीत सेवा गृहीत धरुन उपदान अदा करण्यात येते. संस्थान कर्मचारी हे शासकीय कर्मचारी नाहीत. त्यामुळे त्यांना राज्य शासनाने कळविल्यानुसार शासन निर्णय क्रमांकःसेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.०१.०३.२०१९ च्या परिच्छेद ६ प्रमाणे रु.१४ लक्ष पर्यंत उपदान लागु करणे ही बाब शासनाच्या व मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणणे गरजेचे वाटते. त्यामुळे संस्थान कर्मचा-यांना फायदेशीर असल्याने The Payment of Gratuity Act, 1972 नुसार रु.२० लक्ष पर्यंत उपदान अदा करण्याची शिफारस करण्यात येत आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे व विधी व न्याय विभागाकडे समितीचे निर्णयानुसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात यावा".*

*तसेच या प्रक्रियेस कालावधी लागणार असल्याने दरम्यानचे काळात सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना राज्य शासनाने कळविल्यानुसार शासन निर्णय क्रमांकःसेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.०१.०३.२०१९ च्या परिच्छेद ६ प्रमाणे रु.१४ लक्ष पर्यंत उपदान अदा करण्यात यावे."*

**दि.०६/०८/२०२१ रोजीच्या मा.तदर्थ समितीच्या सभेतील निर्णय क्र.१४५.**

*"यापुर्वी या प्रकरणात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्याचा निर्णय झालेला आहे. असा सी.ए.दाखल करताना त्यामध्ये शासनाचा नवील जी.आर.मा.उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून देण्यात यावा."*

**विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन निर्देश/पत्र-**

१) **दि.०४/०२/२०१९: -** उपदानाबाबत खालील बाबींची पूर्तता करणेबाबत कळविले होते.

 १) सेवा उपदानाची रक्कम वाढविण्याचा निर्णय ज्याच्या आधारे घेण्यात आला त्या कागदपत्रांची/निर्णयाच्या प्रती,

 २) उपदान वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला त्याबाबतची सविस्तर टिपणी/ स्पष्टीकरण/ कारणमिमांसा स्पष्ट करावी,

 ३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या आस्थापनेवरील पदे राज्य शासनाच्या पदांशी समकक्ष आहेत किंवा कसे? या पदांना म.ना.से.(सुधारित वेतन) नियम, २००९ मधील तरतूदी लागु करण्यात येतात किंवा कसे यासंदर्भातील स्पटीकरण सादर करण्यात यावे.

२) **दि.०९/०७/२०२०:-** उपदानाबाबत वित्त विभाग शासन निर्णय क्रमांकःसेनिवे-२०१९प्र.क्र.२८/सेवा-४ दि.०१.०३.२०१९ च्या परिच्छेद ६ मध्ये नमूद तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

३) **दि.२०/०७/२०२१:**

१) *उपदानाबाबत दि.०९.०७.२०२० रोजीचे पत्र याद्वारे अधिक्रमीत करण्यात येत आहे.*

२) *The Payment of Gratuity Act, १९७२ (Amendment) Act, २०१८ (Act No.१२ of २०१८) अन्वये झालेल्या दुरुस्तीनुसार केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने दि.२९ मार्च, २०१८ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कायम अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रु.२० लाख मात्र मर्यादेपर्यंत उपदान अदा करता येईल."*

**मा.उच्च न्यायालय यांचा दि.०४/१०/२०२१ रोजीचा आदेश:-** The pending Civil Applications for seeking permission of this Court for various purposes also stand disposed off, with the rider that all issues put forth in the Civil Applications may be taken up by the new committee after 19.10.2021, subject to there being no legal impediment.

**मा.सर्वोच्च न्यायालय यांचा दि.३०/११/२०२१ रोजीचा आदेश:-** In the meantime, we make it clear that the Shree Sai Baba Sansthan Manegement Committee (In short "the Committee) shall not take any major policy decisions or financial decisions except for routine expences for managing day to day affairs of the Committee.

**प्रस्तावना-** श्री साईबाबा संस्थान कर्मचा-यांना, साधारणतः मा.कोर्ट रिसिव्हर काळापासुन म्हणजेच दि.१६.०४.१९६६ पासुन संस्थान कायम कर्मचा-यांना त्यांच्या सेवेच्या प्रत्येक वर्षाच्या १५ दिवस इतकी ग्रॅच्युईटी देणेबाबत आदेश झालेला आहे. त्यानंतर मा.कामगार उप आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी दि.०२/१२/१९९२ व दि.१८/०१/१९९३ रोजीच्या पत्राद्वारे संस्थान कर्मचा-यांना The Payment of Gratuity Act 1972 च्या तरतूदीनुसार ग्रॅच्युईटी देणेबाबत अभिप्राय दिला आहे.

संस्थानने सन २००१ पासुन संस्थान कर्मचा-यांसाठी एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांची गृप ग्रॅच्युईटीची योजना लागू केलेली आहे. याकामी संस्थानने एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांचेसोबत सन २००१ मध्ये करार केलेला असुन, कराराप्रमाणे संस्थान, एलआयसीकडे दरवर्षी अंशदानाची रक्कम जमा करत असुन, संस्थानचे सेवानिवृत्त कर्मचा-यांना एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांचेकडून येणा-या रकमेनुसार उपदानाची रक्कम आदा करण्यात येते व मयत संस्थान कर्मचा-यांना उर्वरीत सेवेचा कालावधी ( Life Cover) गृहीत धरुन उपदानाची रक्कम दिली जाते. या फंडात आजपर्यंत रक्कम रु.७८ कोटी मात्र गुंतवणुक असुन, त्यावर एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांचेकडून संस्थानला वार्षीक साधारणतः ७.२०% दराने व्याज मिळते.

ग्रॅच्युईटी (उपदान) रकमेच्या मर्यादेत केंद्र शासनाकडून वेळोवेळी करण्यात आलेले बदल व त्यानुसार संस्थान व्यवस्थापनाने घेतलेले निर्णय व त्याअनुषंगाने केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशील पुढीलप्रमाणे-

१) **सन २०१०-**

The Payment of Gratuity Act, १९७२ (Amendment) Act अन्वये झालेल्या दुरुस्तीनुसार केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने, दि.२४ मे, २०१० रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार ग्रॅच्युईटी रकमेची कमाल मर्यादा रु.३.५० लाखवरुन रु.१० लाख पर्यंत वाढली. त्यास अनुसरुन, संस्थान कर्मचा-यांच्या ग्रॅच्युईटीच्या कमाल मर्यादेत तशी वाढ करणेबाबत दि.०४/०७/२०१० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील निर्णय क्र.५५४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

२) **सन २०१८-**

अ) The Payment of Gratuity Act, १९७२ मध्ये सन २०१८ साली झालेल्या बदलानुसार (Act No.१२ of २०१८) केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने दि.२९ मार्च, २०१८ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार दि.२९ मार्च, २०१८ पासुन ग्रॅच्युईटी रकमेची कमाल मर्यादा रु.१० लाखवरुन रु.२० लाख पर्यंत वाढली. त्यास अनुसरुन जे संस्थान कर्मचारी दि.२९/०३/२०१८ नंतर संस्थान सेवेतून सेवानिवृत्त होतील त्या कर्मचा-यांना उपरोक्त तरतुदीनुसार ग्रॅच्युईटीची रक्कम आदा करण्यास मान्यता देण्यात आली व त्याप्रमाणे शासनास कळविण्यात यावे असा दि.१३/१२/२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेत निर्णय क्र.७३१ झालेला आहे.

आ) मा.व्यवस्थापन सिमतीच्या निर्णयास अनुसरुन नवीन तरतुदीनुसार दि.२९/०३/२०१८ ते माहे मार्च २०२० पर्यंत ६० संस्थान सेवानिवृत्त/मयत कर्मचा-यांना उपदानाची रक्कम आदा करण्यात आलेली आहे.

३) **सन २०१९-**

मा.विधी व न्याय विभाग यांनी दि.०४/०२/२०१९ च्या पत्रान्वये संस्थानला काही बाबींची पुर्तता करणेबाबत कळविले होते. त्यास अनुसरुन संस्थानने दि.३० ऑगष्ट, २०१९ चे पत्रान्वये पुर्तता केली.

४) **सन २०२०-**

अ) **शासन पत्र दि.०९/०७/२०२०-** उपदानाबाबत विधी व न्याय विभागाने वित्त विभाग शासन निर्णय क्रमांकः सेनिवे-२०१९प्र.क्र.२८/सेवा-४ दि.०१.०३.२०१९ च्या परिच्छेद ६ मध्ये नमूद तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. *(रक्कम रु.१४ लाख पर्यंत उपदानाची रक्कम आदा करणेबाबत)*

आ) दि.२८/०८/२०२० रोजी झालेल्या संस्थानच्या मा.तदर्थ समितीच्या सभेपुढे प्रस्ताव निर्णयार्थ सादर केला असता, त्यावर निर्णय क्र.४२४ अन्वये, संस्थानने उपदानाची रक्कम रु.२० लक्ष पर्यंत वाढविण्याचा संस्थानने महाराष्ट्र शासनाला पाठविलेला प्रस्ताव अमान्य केलेला असल्याने सदरहु शासन निर्णयाचे विरोधात जावून उपदानाच्या रक्कमेत अशी वाढ करता येणार नाही असे समितीने एकमताने ठरवले. सबब, सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. सदचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन करुन मान्यता घेण्यात यावी असे ठरले. तथापि, मा.तदर्थ समितीच्या निर्णयानुसार संस्थानचे विधी विभागाकडून याकामी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आलेले नसल्याचे समजते.

दि.२८/०८/२०२० च्या मा.तदर्थ समितीच्या निर्णयास अधिन राहून ९५ संस्थान सेवानिवृत्त कर्मचा-यांना शासनाच्या दि.०९/०७/२०२० च्या पत्रानुसार रक्कम रु.१४.०० लक्ष पर्यंत उपदानाची रक्कम आदा करण्यात आलेली /येत आहे.

इ) दि.२९/१२/२०२० रोजीच्या मा.तदर्थ समितीच्या सभेत संस्थान कर्मचारी हे शासकीय कर्मचारी नाहीत. त्यामुळे त्यांना रु.१४ लक्ष पर्यंत उपदान आदा करणे ही बाब योग्य ठरणार नाही असे शासनाच्या व मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणणे गरजेचे आहे. तसेच The Payment of Gratuity Act, 1972 नुसार रु.२० लक्ष पर्यंत उपदान संस्थान कर्मचा-यांना आदा करणे फायदेशीर असल्याने तशी शिफारस करण्यात आली. याप्रमाणे मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे व विधी व न्याय विभागाकडे समितीचे निर्णयानुसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात यावा". असे ठरले.

५) **सन-२०२१-**

अ) **विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२०/०७/२०२१ पत्रान्वये, त्यांचे**

१) दि.०९/०७/२०२० चे पत्र अधिक्रमीत करण्यात येत आहे तसेच

२) संस्थान कर्मचा-यांना The Payment of Gratuity Act**,** १९७२ **(**Amendment) Act, २०१८ **(**Act No.१२ of २०१८**)** अन्वये झालेल्या दुरुस्तीनुसार केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने दि.२९ मार्च**,** २०१८ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कायम अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रु.२० लाख मात्र मर्यादेपर्यंत उपदान अदा करता येईल असे कळविले आहे.

आ) मा.तदर्थ समितीच्या दि.०६/०८/२०२१ च्या सभेत सेवानिवृत्त संस्थान कर्मचा-यांच्या उपदानाच्या रकमेबाबत Civil Application दाखल करण्याचा निर्णय यापूर्वी झालेला असून C.A.दाखल करताना शासनाच्या उपरोक्त पत्राप्रामाणे (G.R.) मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देणेचे ठरले होते.

तथापि, मा.तदर्थ समितीच्या निर्णयानुसार संस्थानचे विधी विभागाकडून याकामी दि.२५/११/२०२१ पर्यंत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आलेले नसल्याचे समजते. त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.३०/११/२०२१ च्या आदेशान्वये नवीन मा.व्यवस्थापन समिती अस्तित्वात आलेली असून त्या समितीला सध्या धोरणात्मक व आर्थिक निर्णय घेण्याची मुभा देण्यात आलेली नाही.

**विभागाचा अभिप्रायः-** दि.१३/१२/२०१८ च्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील निर्णयानुसार ग्रॅच्युईटी रकमेची कमाल मर्यादा रु.१० लाखावरुन रु.२० लाखापर्यंत केल्याने त्याप्रमाणात एल.आय.सी.पुणे यांचेकडे संस्थान कर्मचा-यांची अंशदानाची रक्कम भरण्यात आलेली आहे व एल.आय.सी.पुणे यांनीही संस्थान कर्मचा-यांची उपदानाची रक्कम नवीन सुत्रानुसार (रु.२० लाख) पाठविलेली आहे. त्याप्रमाणे संबंधित सुरुवातीच्या ६० सेवानिवृत्त कर्मचा-यांना रु.२० लाखाच्या सुत्रानुसार आदाही करण्यात आली आहे.

त्यानंतर मात्र माहे मार्च-२०२० ते आजतागायत सेवानिवृत्त झालेल्या ९५ कर्मचा-यांना उपदानाची रक्कम १४ लाखांचे सुत्रानुसार आदा करण्यात आलेली /येत आहे. आता शासनाने त्यांचे दि.२०/०७/२०२१ रोजी

पत्रान्वये दि.०९/०७/२०२० चे पत्र अधिक्रमीत करण्यात येत असलेबद्दल व संस्थान कर्मचा-यांना उपदानाची रक्कम (पुर्वीप्रमाणे) म्हणजेच The Payment of Gratuity Act 1972 अन्वये आदा करणेबाबत कळविले आहे. त्यामुळे आता पुर्वीपमाणेच रक्कम रु.२० लाखांचे सुत्रानुसार उपदानाच्या फरकाची रक्कम आदा करावी लागेल. उपदानाची रक्कम रु.२० लाखाच्या सुत्रानुसार आदा करण्याचा निर्णय यापूर्वीच्या व्यवस्थापन समितीच्या सभेत पारित झालेला आहे. त्यामुळे आता यावर कुठल्याही धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता नाही असे वाटते. सदरची बाब ही नियमीत खर्चाची आहे. त्यामुळे सेवानिवृत्त संस्थान कर्मचा-यांचा तगादा विचारात घेता, शासनाच्या पत्राप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या अवलोकनार्थ व नोंद घेण्यासाठी ठेवणेकामी सदरचा प्रस्ताव आयत्या वेळचा विषय म्हणून सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**प्रस्ताव/मागणी**:- विभागाच्या अभिप्रायमध्ये नमुद केलेप्रमाणे, शासनाने त्यांचे दि.२०/०७/२०२१ रोजीचे पत्रान्वये दि.०९/०७/२०२० चे पत्र अधिक्रमीत करण्यात येत असलेबद्दल व संस्थान कर्मचा-यांना उपदानाची रक्कम (पुर्वीप्रमाणे) म्हणजेच The Payment of Gratuity Act 1972 अन्वये आदा करणेबाबत कळविले असल्याने, आता पुर्वीपमाणेच उपदानाची रक्कम आदा करणे ही बाब धोरणात्मक निर्णयाची नसल्याने तसेच नियमीत खर्चाची असल्याने, सेवानिवृत्त संस्थान कर्मचा-यांचा तगादा विचारात घेता शासनाच्या पत्राप्रमाणे (रक्कम रु.२० लाख मात्र या कमाल मर्यादेपर्यंत) कार्यवाही करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे अवलोकनार्थ व नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.शासनाने दि.२०.०७.२०२१ रोजीचे पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार संस्थानमधील कायम कर्मचा-यांना The Payment of Gratuity Act,1972 च्या तरतुदीनुसार उपदानाची (Gratuity) रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **१. सन २०२२ करीता बुंदी लाडू, सुटी बुंदी (गरज भासल्यास) व बर्फी प्रसाद बनवुन पॅकिंग करणे इत्यादी कामांसाठी नवीन ठेकेदार नियुक्तीची ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व २. ई-निविदा प्रिक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्या नियुक्त केलेल्या ठेकेदारास आहे त्याच अटी शर्तीवर आहे त्याच दराने मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम २१(१घ) मध्ये, श्री साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे असे नमूद आहे.

**(अ) प्रस्तावना**– श्री साईभक्तांना मोतीचुर लाडु प्रसाद, सुटी बुंदी प्रसाद तसेच बर्फी प्रसाद इ. पदार्थ लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन बाह्यस्त्रोत ठेकेदारामार्फत उक्त्या मजुरी दराने तयार करुन घेतले जातात. सन २०२१ करीता, सध्या जा. क्र. एसएसएस/लाडु प्रसाद/२८९०/२०२०, दिनांक ३० डिसेंबर,२०२० रोजीचे कार्यादेशान्वये, दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांना दिनांक ०१ जानेवारी, २०२१ पासून उक्त्या मजुरी दराने लाडु, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करून पॅकिंग करून देण्याचा बाह्यस्त्रोत ठेकेदार म्हणून ठेका देणेत आलेला आहे. सदर ठेक्याची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपत आहे.

त्यास अनुसरुन, मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेतील **निर्णय क्र. ९५** अन्वये, येत्या सन २०२२ करीता (दिनांक ०१ जानेवारी, २०२२ ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीसाठी) लाडु व गरज भासल्यास मोफत सुटी बुंदी प्रसाद तसेच बर्फी प्रसाद उक्ते मजुरी दराने / पध्दतीने बनविणे इ. कामासाठी ई-निविदा प्रकाशित करणेकामी व सदरचे काम उक्त्या मजुरी पध्दतीने देणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळालेली असून, सदरचे काम अंदाजीत खर्चाची रक्कम रुपये ०१.५० कोटी मात्रचे असलेने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस दिवाणी अर्ज सादर करणेबाबत सदरहू निर्णयात निर्देशीत करणेत आलेले आहे.

सदरहू निर्णयानुसार, संस्थानाचे विधी विभागामार्फत ॲड. अनिल बजाज, औरंगाबाद यांना विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दिवाणी अर्ज दाखल करणेबाबत दिनांक २३ ऑगष्ट, २०२१ रोजी पत्र देणेत आले होते. तथापी, कायदेशीर बाबींच्या गुंतागुंतीमुळे दिवाणी अर्जाबाबतची कार्यवाही अद्यापपावेतो प्रलंबित आहे.

आता दि.०३/१२/२०२१ रोजीपासुन मा. शासन नियुक्त मा. व्यवस्थापन समितीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचा पदभार स्विकारलेला आहे, प्र. विधी अधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार, भक्तांना लाडू व बर्फी प्रसाद ही सुविधा उपलब्ध करुन द्यावयाचे काम व त्या कामकाजासंबंधीत प्रस्ताव हा सदरहू काम नियमित कामकाजाचा भाग असल्याने, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेची गरज राहणार नाही, असे मत पडले.

आता, विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, सध्या कार्यरत असणारे बाह्यस्त्रोत ठेकेदाराची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने, याकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून, ती अंतिम होऊन, कार्यादेश देणेस आता विलंब होणार आहे.

**(ब) विभागाचा अभिप्राय -**

**(०१)** उपरोक्त नमुद परिस्थिती पाहता, विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मा. शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिध्द करणे, त्यासंबंधित तांत्रिक व व्यावसायिक निविदा उघडणे, न्यूनतम दरधारकाची निवड करुन त्यास अंतिम कार्यादेश देणे आदि बाबींसाठी बराचसा कालावधी लागणार आहे, त्यामुळे सध्या कार्यरत असणारे बाह्यस्त्रोत ठेकेदार दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांना दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजीचे कार्यादेशात नमुद केलेल्या मंजूर दरानुसार आणि आहे त्याच अटी-शर्तीवर नवीन ठेकेदाराची नेमणूक प्रक्रिया पूर्ण होईपावेतो मुदतवाढ देता येईल व नवीन ठेकेदाराची नियुक्ती झालेनंतर सदर ठेकेदाराची मुदतवाढ आपोआप संपुष्टात येईल.

**(०२)** विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, सध्या कार्यरत असणा-या ठेकेदारांस मुदतवाढ दिल्यानंतर दरम्यानचे कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबवून, पात्र निविदाधारकांस अंतिम कार्यादेश देता येईल असे मत आहे.

**(क) विभागाचा प्रस्ताव –**

उपरोक्त विषयांस अनुसरुन, **परिच्छेद अ** व **ब** मध्ये नमूद केलेल्या सविस्तर विवेचनास अनुसरुन,

**(०१)** विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मा. शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिध्द करणे, त्यासंबंधित तांत्रिक व व्यावसायिक निविदा उघडणे, न्यूनतम दरधारकाची निवड करुन त्यास अंतिम कार्यादेश देणे आदि बाबींसाठी बराच कालावधी लागणार आल्याने सध्या कार्यरत असणारे बाह्यस्त्रोत ठेकेदार दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांना दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजीचे कार्यादेशात नमुद केलेल्या मंजूर दरानुसार आणि आहे त्याच अटी-शर्तीवर, नवीन ठेकेदाराची नेमणूक प्रक्रिया पूर्ण होईपावेतो किंवा दिनांक ३१ मार्च, २०२२ अखेर ०३ महिने यापैकी जे अगोदर घडेल तो पावेतो मुदतवाढ देणेस मान्यता असावी.

**(०२)** तसेच दरम्यानचे कालावधीत, विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, प्रचलित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया प्रशासकीय स्तरावर सुरु करणेस आणि त्याकामी करावयाची प्रसिध्द करावयाची जाहिरात व इतर अनुषंगिक कामकाज पूर्ण करणेस आणि त्यासाठी येणारे सर्वसमावेशक अनुषंगिक खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त **परिच्छेद क** मधील **बाब क्रमांक ०१ व ०२** यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२ करीता बुंदी लाडू, सुटी बुंदी (गरज भासल्यास) व बर्फी प्रसाद बनवुन पॅकिंग करणे इत्यादी कामांसाठी नवीन ठेकेदार नियुक्ती करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक अनुषंगिक खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी सध्या कार्यरत असणारे बाह्यस्त्रोत ठेकेदार दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांना दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजीचे कार्यादेशात नमुद केलेल्या मंजूर दरानुसार आणि आहे त्याच अटी-शर्तीवर नवीन ठेकेदाराची नेमणूक प्रक्रिया पूर्ण होईपावेतो किंवा दिनांक ३१ मार्च, २०२२ अखेर यापैकी जे अगोदर घडेल तो पावेतो मुदतवाढ देणेस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, धुणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर (ब्लॅकेट) धुणे व गादीच्या खोळी धुणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक होईपावेतो आहे त्याच मागील वर्षाचे दरात मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:-**२१(१)(ग) " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम(१)(ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्तावना:-** श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी मार्फत साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागात साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. या विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागातील खोल्यांमधील बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर धुणे (ब्लॅकेट) व गादीच्या खोळी धुणेचे कामे आऊटसोर्स लॉण्ड्री ठेकेदाराकडून करुन घेतले जातात.

सन २०२०-२१ मधील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर एक वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागातील लॉन्ड्री कामाचा मा.तदर्थ (Ad-hoc) समिती दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.७६ निर्णय क्र.५२८ अन्वये दोन निम्नतम दरधारक १) गुरुकृपा लॉण्ड्री, शिर्डी यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम/२८९३/२०२० दि.३१/१२/२०२० अन्वये व २) घरौंदा वॉशिग कंपनी शिर्डी यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम/२८९४/२०२० दि.३१/१२/२०२० अन्वये खालील कोष्टकात दर्शविले प्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

१) गुरुकृपा लॉण्ड्री, शिर्डी खालीलप्रमाणे कपड्यांकरीता निम्नतम दर प्राप्त झाले

| **अ.नं** | **कपड्यांचा तपशील** | गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी **प्रती नग दर रु. (सर्वकरासह)** |
|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | **३.५०** |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | **१.५०** |
| ३ | चादर धुणे (ब्लॅकेट) | **६.३०** |
| ४ | गादीच्या खोळी धुणे | **७.७५** |

२) घरौंदा वॉशिंग कंपनी शिर्डी यांचे खालीलप्रमाणे कपड्यांकरीता निम्नतम दर प्राप्त झाले

| **अ.नं** | **कपड्यांचा तपशील** | घरौंदा वॉशिंग कंपनी, शिर्डी **प्रती नग दर रु. (सर्वकरासह)** |
|---|---|---|
| १ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | **३.००** |
| २ | सोलापूर चादर धुणे | **८.००** |

**प्रस्ताव:-** साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर धुणे (ब्लॅकेट), गादीच्या खोळी धुणेचे कामे करत असलेल्या लॉण्ड्री कॉन्ट्रॅक्टर १) गुरुकृपा लॉण्ड्री, शिर्डी व २) घरौंदा वॉशिग कंपनी शिर्डी यांचा कार्यादेशाचा कालावधी दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर असून, सदर कालावधी दि.३१/१२/२०२१ रोजी संपुष्टात येणार असल्याने, साईभक्तांना देण्यात येत असलेली लॉण्ड्री सेवा सुविधामध्ये गैरसोय होऊ नये. यासाठी सन २०२१-२२ मधील दि.०१/०१/२०२२ ते दि.३१/१२/२०२२ करीता नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करणेकामी नव्याने दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणे व त्याकामी येणा-या खर्चास मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची चक्रिय पध्दतीने दि.२०/११/२०२१ रोजी मान्यता मिळालेली असून, ई-निविदा मसुदा तयार करुन सदर मसुदा दस्तऐवज तपासणी समितीकडून तपासणी करणेत येत आहे. ई-निविदा प्रक्रिया राबिवणेस कालावधीत लागल्यास तसेच सध्या कार्यरत असलेल्या लॉण्ड्रीधारकांचा लॉण्ड्री कामाचा कार्यादेश दि.३१/१२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने, कार्यादेशातील अट क्र.३७ "पुढील वर्षासाठी नवीन ठेकेदाराला

कार्यादेश पारीत होऊन नवीन ठेकेदाराने काम सुरु करेपर्यंत आपणास आहे त्याच मंजूर दरात काम करुन देणे बंधनकारक आहे. कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही." अशी अट नमूद असून, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर(ब्लॅकेट) धुणे व गादीच्या खोळी धुणेकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्याचे लॉण्ड्रीधारक १) गुरुकृपा लॉण्ड्री, शिर्डी व २) घरौंदा वॉशिग कंपनी शिर्डी यांचेकडून आहे त्याच मागील मंजूर दरात तसेच अटी शर्तीनुसार दि.३१/०१/२०२२ पर्यंत अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ कार्यादेश देऊन कामे करुन घेता येईल.

साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/०३/२०२१ अखेर तीन महिन्यांमध्ये रु.३,९३,७२६/- एवढा खर्च झालेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | महिना | गुरुकृपा लॉण्ड्री शिर्डी व घरौंदा वॉशिंग कंपनी शिर्डी बील रक्कम रुपये. | | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| | | साईआश्रम भक्तनिवास | साईधर्मशाळा | |
| ०१ | जानेवारी-२०२१ | १,९७,२४० | - | १,९७,२४० |
| ०२ | फेब्रुवारी-२०२१ | १,२१,२६४ | - | १,२१,२६४ |
| ०३ | मार्च- २०२१ | ७५,२२२ | - | ७५,२२२ |
| | एकूण | ३,९३,७२६ | - | ४,३८,७२६/- |

माहे एप्रिल-२०२१ पासून कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सर्व निवासस्थाने बंद करण्यात आले होते. मुदतवाढ देणेकामी माहे जानेवारी -२०२१ ते मार्च २०२१ या तीन महिन्यात झालेला खर्च रु.३,९३,७२६ अूसन, म्हणजेच दरमहा सरासरी अंदाजे रु.१,३१,२४२/- खर्च अपेक्षित आहे. तसेच साईधर्मशाळा विभागाकडे सदर कार्यादेशाच्या कालावधीत कोव्हीड सेंटर असल्याने त्याठिकाणी कोणताही लॉण्ड्री खर्च झालेला नाही.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-**

१) सन २०२०-२१ मधील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधीकरीता देण्यात आलेल्या लॉण्ड्री कामाचा कालावधी दि.३१/१२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने, सन २०२१-२२ मधील दि.०१/०१/२०२२ ते दि.३१/१२/२०२२ या कालावधीकरीता ई-निविदा प्रक्रिया राबिवणेत येत असून, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर(ब्लॅकेट) धुणे व गादीच्या खोळी धुणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपावेतो सध्याचे लॉण्ड्रीधारक १) गुरुकृपा लॉण्ड्री, शिर्डी व २) घरौंदा वॉशिग कंपनी शिर्डी यांचेकडून आहे त्याच मागील मंजूर दरात व अटी शर्तीनुसार दि.३१/०१/२०२२ पर्यंत अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ कार्यादेश देऊन लॉण्ड्रीचे काम करुन घेणेस मान्यता असावी.

२) साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता दरमहा सरासरी अंदाजे रु.१,३१,२४२/- (अक्षरी रु.एक लाख एकतीस हजार दोनशे बेचाळीस मात्र) व साईधर्मशाळा विभागाकडे कोव्हीड सेंटर असल्याने, त्याठिकाणी चालू कार्यादेश कालावधीत खर्च झालेला नाही. मात्र मुदतवाढ कालावधीत लॉण्ड्रीचे काम करुन घ्यावयाचे झाल्यास दरमहा सरासरी अंदाजे रु.१५,०००/- (अक्षरी रु.पंधरा हजार मात्र) अशा एकत्रित एकूण रक्कम रु.१,४६,२४२/- (अक्षरी रु.एक लाख शेहेचाळीस हजार दोनशे बेचाळीस मात्र) या येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळावी.

उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे ०१, व ०२ बाबींस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, धुणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर (ब्लॅंकेट) धुणे व गादीच्या खोळी धुणेकामी सध्या कार्यरत असलेले लॉण्ड्रीधारक गुरुकृपा लॉण्ड्री, शिर्डी व घरौंदा वॉशिंग कंपनी, शिर्डी यांना मागील मंजूर दरात व अटी शर्तीनुसार दि.३१.०१.२०२२ पर्यंत अथवा प्रस्तुत प्रकरणी राबविणेत येत असलेली ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नवीन लॉण्ड्रीधारकास कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तो पर्यंत मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास/साईधर्मशाळा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **शासन निर्णय व परिपत्रके वाचन –**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थानच्या आस्थापनेवरील पात्र असणा-या स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना सन २०२०-२१ वर्षाकरीता दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबत.**

**निर्णय क्र.३५०** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थानच्या आस्थापनेवरील पात्र असणा-या स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना सन २०२०-२१ वर्षाकरीता दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान मंजूर करणेबाबत शासन निर्णय क्रमांक सांसवि १०२१/७३४/प्र.क्र.२१५/का.१६, दि.३ नोव्हेंबर, २०२१ चे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं. १८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स अॅण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांचे प्रकल्पाचे कामासाठी मुदतवाढ मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद** : अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४ नुसार ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स अॅण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांना कार्यादेश देण्यात आला असुन सदरहू कामाचा तपशिल खालील प्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | मौजे निमगाव को-हाळे गट नं.१८३ मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प उभारणे. |
| २. | ठेकेदार | मे. न्याती इंजिनिअर्स अॅण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे |
| ३. | मंजूर निविदा रक्कम | रु.२१८/- कोटी. |
| ४. | कार्यादेश क्र. व दिनांक | १) जा.नं.५६३६/२०१९ दि.०८/०३/२०१९<br>२) जा.नं.१६९०/२०१९ दि.०३/०८/२०१९ |
| ५. | काम सुरु करण्याचा | दिनांक २३/०३/२०१९. |
| ६. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | १८ महिने (दि.२२/०९/२०२० अखेर) |
| ७. | प्रथम मुदतवाढ | ०६ महिने (दि.२२/०३/२०२१ अखेर) मा. तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९३ |
| ८. | व्दितीय मुदतवाढ | ०६ महिने (दि.२२/०९/२०२१ अखेर) मा. तदर्थ समितीचे दि.३१/०७/२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९ |
| ७. | कामाची सद्यस्थिती | • **इंग्लिश मेडियम स्कूल इमारत, कन्या विद्या मंदिर इमारत, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, स्पोर्ट कॉम्पलेक्स व स्विमिंग पुल** - या इमारतींची सर्व कामे पुर्ण करणेत आलेली आहे.<br>• **परिसर विकास** – परिसर विकासाची निविदेनूसार सर्व कामे व एस.टी.पी. ते नाल्या पर्यंत ड्रेनेज लाईन जोडणेचे काम पुर्ण झाले आहेत.<br>• **ऑडीटोरीयम** - या इमारतींची सर्व कामे पुर्ण करणेत आलेली असून फायर फायटींग व विद्युतीकरणाचे कामांसाठी लावणेत आलेले स्कॅफोल्डींग काढणेचे काम सुरू आहे. |

श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्पास करारनाम्यानुसार काम पुर्ण करण्यासाठी १८ महिने दि.२३/०३/२०१९ ते दि.२२/०९/२०२० असा कालावधी देणेत आलेला होता. तसेच राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे कंत्राटदाराना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीं संदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे विषयीचे महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयानूसार ठेकेदार यांना प्रकल्पाचे उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी कोणतीही दरवाढ न देता सहा महिने दि.२२/०३/२०२१ या

कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मा. तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता सदरहू सभेतील निर्णय क्र.४९३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आला आहे.

*"...यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ पै.मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्प्लेक्सचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांचे प्रकल्पाचे कामास कोणतीही दरवाढ न देता सहा महिने कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली."*

ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांनी त्यांचे दि.०९/०७/२०२१ रोजीचे पत्राने प्रकल्पाचे कामास ०६ महिने म्हणजेच दि.२२/०९/२०२१ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली होती. ठेकेदार यांचे सदरहू विनंतीबाबत मा.तदर्थ समितीचे दि.३१/०७/२०२१ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.७९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आला आहे.

*"...यावर सविस्तर चर्चा केली, दि.२२ सप्टेंबर, २०२१ पर्यंत कुठलीही दरवाढ न देण्याचे अटीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली, यापुढे कुठल्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही."*

ठेकेदार यांनी आता वरीलप्रमाणे सर्व कामे पुर्ण केली असून त्यांचे दि.२४/१२/२०२१ रोजीचे पत्राने सदरहू कामास दि.३१/१२/२०२१ अखेर पर्यंत मुदतवाढ मागणी करणेसाठी खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

*"With reference to above subject, the completion date of the project as per above work order is 22nd September 2020. However due to Covid- 19 pandemic situation we have got extension of one year. As per above extension letter (reference 4). The completion date of the project was 22nd September 2021. As per our letter mentioned under reference 6 all work is completed except Auditorium building.*

*We are facing lots of problem to arrange materials & labour to complete the project in stipulated time due to Covid-19 pandemic situation. The firefighting work of Auditorium building is having two levels & the total roof height is about 21 Meter having entire volume of scaffolding about 21000 cubic meter.*

*It takes lot of time for shifting of material & erection of scaffolding. Now our all work is completed. Only Dismantling of scaffolding is in process. After cleaning the Auditorium building will be handover up to 31st December 2021.*

*We have obtained lift license from competent authority and load sanction for power supply of 630 Kva & power is resumed at the campus. Fire NOC is in process & will get the same shortly.*

*Hence kindly grant the extension of the project up to 31st December 2021 without penalty & issue us the completion certificate of the project."*

प्रकल्पाचे आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांनी त्यांचे दि.२४/१२/२०२१ रोजीचे पत्राने ठेकेदार यांचे मुदतवाढ मागणीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

*"With reference to the above subject and reference letter mentioned under serial no.: 1, we had informed Sansthan regarding balance activities of work. Now contractor has requested time extension up to 31st December 2021 to complete the said remaining work and handing over the complete project vide its letter dated 24.12.2021.*

*Following points needs to be considered regarding extension request of the contractor.*

*We had visited the site on 21.09.2021 and submitted the status of the project as below*

1. *Contractor completed English Medium School, Kanya Vidya Mandir, Jr & Sr college Building, Sport Complex Building, Swimming Pool & all development work before 22.09.2021. only Auditorium building firefighting & glazing work, etc.. was balance.*

*2.Now contractor completed his all-balance work in all respect. Only Dismantling of scaffolding and handing over of Auditorium buildings is in process.*

*3.Till today due to COVID-19 the total construction industry has been disturbed in respect of supply of material and availability of labour. Our project is delayed due to the same reason. Which should be treated as force majeure*

*After considering all above points we recommend the extension up to 31st December 2021. The same may please be granted"*

निविदेतील पृष्ठ क्र.०५ वरील शर्त क्र.०७ मध्ये Liquidated Damages / Penalty बाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

*"0.05% of the original signed Contract Value per day for delayed completion. The total compensation for delay shall further be subject to an overall maximum of 10% (Ten percent) of the contract amount as awarded, after which the Architect shall get the work done from any other party & deduct the sum thereafter from the main Contractor's securities/ guarantees / deposits/ bills due on any account."*

त्यानूसार याकामासाठी रु.१०,९०,०००/- मात्र प्रती दिवस प्रमाणे दि.२३/०९/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर रु.१०,९०,००,०००/- मात्र दंडाची रक्कम होत आहे.

**विभागाचा अभिप्राय :-**

आर्किटेक्ट यांनी त्यांचे दि.२२/०९/२०२१ रोजीचे पत्राने त्या तारखेपर्यंत प्रकल्पातील काही कामे वगळता उर्वरीत कामे पुर्ण झाल्याचे कळविले होते. त्यानूसार प्रकल्पाचे कामास दिलेल्या दि.२२/०९/२०२१ पर्यंतचे मुदतीत ठेकेदार यांनी इंग्लिश मेडियम स्कूल इमारत, कन्या विद्या मंदिर इमारत, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, स्पोर्ट कॉम्पलेक्स व स्विमिंग पुल या इमारतींचे कामे पुर्ण केलेली होती.

राज्यात कोरोना साथीच्या आलेल्या दुस-या लाटेच्या प्रादुर्भावामुळे लावणेत आलेल्या निर्बंधांमुळे कुशल / अकुशल कारागीर उपलब्ध होणेसाठी अडचण निर्माण झाली. त्यामुळे ऑडीटोरीयम इमारतीचे वायरकट विट बांधकामाचे काम पुर्ण करणेस विलंब झाला.

तसेच प्रकल्पाचे एस. टी. पी. ते नाल्या पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणेचे जागेवर पावसाळ्यात मोठया प्रमाणात पाणी साचलेले असल्याने ड्रेनेज लाईन साठी खोदकाम करणेस अडचण येत होती. त्यामुळे सदरचे काम पाऊस कमी झाल्यावर ऑक्टोबर २०२१ मध्ये करणेत आले.

ऑडीटोरीयम इमारतीचे छताची उंची जास्त असल्याने त्यात दोन लेव्हल वर फायर फायटींग पाईपलाईन बसवावी लागली आहे. सदर कामासाठी मोठया प्रमाणात स्कॅफोल्डींग करावी लागली या कामांमुळे आतील बाजूने रंगकाम व विद्युतीकरणाचे कामास विलंब झाला. सदर कामावर अवलंबून असणा-या प्लिंथ प्रोटेक्शन, बेसमेंट व्हेंटीलेटर व कॅनोपी वर्कचे कामास विलंब झाला.

आर्किटेक्ट यांनी त्यांचे दि.२२/०९/२०२१ रोजीचे पत्रात नमूद सर्व कामे ठेकेदार यांनी पुर्ण केली आहेत. त्यामुळे ठेकेदार यांचे मागणी प्रमाणे दंड न आकारता कुठलीही दरवाढ न देणेचे अटीवर दि.३१/१२/२०२१ अखेर पर्यंत मुदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि., पुणे यांचे प्रकल्पाचे कामास दि.३१/१२/२०२१ अखेर दंड न आकारता कुठलीही दरवाढ न देणेचे अटीवर मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५१** **श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि., पुणे यांचे प्रकल्पाचे कामास दंड न आकारता कुठलीही दरवाढ न देणेचे अटीवर दि.३१/१२/२०२१ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी काम पूर्ण करणेसाठी जुन-२०२२ अखेर मूदतवाढ मिळणेसाठी केलेल्या विनंतीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-** अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय -**

**१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४३०** अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

*".. .. यावर सविस्तर चर्चा होवून, ठेकेदार यांना ESS, UGT व STP चे बांधकामासाठी अद्याप संस्थानकडून जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामूळे प्रकल्पाचे सर्व काम पूर्ण करणेसाठी या जागा उपलब्ध करणेत आल्यानंतर तेथून पुढे चार महिन्यांची मूदतवाढ निविदेतील पृष्ठ क्रं.०५ वरील अ.नं.०७ ची Incentive अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर देण्यास मान्यता देण्यात आली".*

**२) मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.३१/०७/२०२१ चे सभेतील नि.क्र.७०** अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

*"..यावर सविस्तर चर्चा केली, प्रस्तावातील अ.नं.०१ ते ०४ बाबत ३१, ऑक्टोबर-२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आली. ही मुदतवाढ अंतिम आहे. यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही. अ.नं.०५ बाबत पुर्वी ठराव झालेला असल्याने त्याचा विचार करण्याची गरज नाही".*

**प्रस्तावना -** श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे बांधकाम श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेमार्फत सुरु आहे. सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल व बांधकामाच्या प्रगतीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **कामाचे नाव** | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| **आर्किटेक्ट** | माथूर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली. |
| **ठेकेदार** | श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई. |
| **कार्यादेश** | १) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८.<br>२) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१९९९/२०१९, दि.२२/०८/२०१९. |
| **मंजूर निविदा रक्कम** | रु.१०९.५० कोटी. |
| **श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई करारनामा** | दि.२२/१०/२०१८.<br>दि.२२/०८/२०१९. |
| **कामाचा कालावधी** | १२ महिने (दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९).<br>मुदतवाढ – दि.३१/१०/२०२१ अखेर. |

**कामाची सद्यस्थिती -**

- **तळमजला** - ग्रेनाईट फ्लोरींग व डॅडोचे काम अंतिम टप्प्यात, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच रेड आग्रा स्टोन बसविणे अंतिम टप्प्यात, रेड आग्रा जाळी बसविणे प्रगतीत, प्लंबींगचे काम अंतिम टप्प्यात, एच.व्ही.ए.सी चे काम अंतिम टप्प्यात, फायर फायटींगचे काम अंतिम टप्प्यात, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम अंतिम टप्प्यात, टॉयलेट वॉटरप्रुफिंगचे काम पूर्ण, रेलिंगचे काम अंतिम टप्प्यात, सज्जाचे मंगलोर टाईल्स बसविणे, अंतर्गत रंगकाम प्रगतीत आहे.
- **पहिला मजला व दुसरा मजला** - ग्रेनाईट फ्लोरींग व डॅडोचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत, रेड आग्रा जाळी बसविणे प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम अंतिम टप्प्यात, प्लंबींगचे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम अंतिम टप्प्यात, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत, टॉयलेट वॉटरप्रुफिंगचे काम प्रगतीत, सज्जाचे मंगलोर टाईल्स बसविणे, अंतर्गत रंगकाम व रेलिंगचे काम प्रगतीत आहे.
- **टेरेस लेव्हलची कामे** - प्रस्तावित तिसरा मजल्याबाबत दि.३१/०७/२०२१ चे सभेतील निर्णयानुसार आता ठेकेदार यांनी टेरेस लेव्हलवरील कामांना सुरूवात केली असून, आता उत्तर व दक्षिण बाजूचे रॅम्पचे व ST4 मोठ्या जीन्याचे

| |
|---|
| स्लॅब कास्टींग पूर्ण झाले आहे तसेच ०८ ममटी रूम व लिफ्ट रूमचे स्लॅब कास्टींग पूर्ण झाले आहे. तसेच पॅरापेट बांधकाम, टेरेस वॉटरप्रुफिंग, फायर फायटींग यंत्रणा पाईपलाईन, स्टोन क्लॅडींग, रेड आग्रा स्टोन कोपींग इ. चे कामे प्रगतीत आहे. |
| **कनेक्टींग कॉरीडॉर** - दर्शनरांग प्रकल्पातील (Connecting Corridor above Pimpalwadi Road from Proposed Main Building to Mandir Complex) आर.सी.सी. काम, बांधकाम व प्लास्टर, स्टोन क्लॅडींग, एच.व्ही.ए.सी, फायर फायटींग, ग्रेनाईट फ्लोरींग, मार्बल डॅडो व टेरेस वॉटरप्रुफिंग, रेलिंगचे इ. कामे पूर्ण झालेली आहेत. आता अंतर्गत रंगकाम, सज्जाचे मंगलोर टाईल्स बसविणे व विद्यूतीकरणाचे काम प्रगतीत आहे.<br>**इतर कामे -** परीसर विकास कामे, स्टॅार्म वॉटर लाईन, सिव्हरेज लाईन, फायर हायड्रंट लाईन, इलेक्ट्रीकल केबलकरीता पाईपलाईन व ट्रेंचचे बांधकाम, चेंबर बांधकाम, पिण्याचे पाण्याची पाईपलाईन, रस्त्याचे कॉन्क्रीटींग, स्टोन क्लॅडींग इ. कामे प्रगतीत आहे, तसेच २४२३ नग गोदरेज लॉकर्स साईटवर प्राप्त झाले आहेत.<br>ESS चे सिव्हील वर्क प्रगतीत आहे व UGT चे काम अंतिम टप्प्यात आहे.<br>STP चे सिव्हील कामे प्रगतीत आहे, तसेच इलेक्ट्रो-मेकॅनिकल उपकरणे साईटवर पोहोच झालेली आहेत. |

श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीचे बांधकाम करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्यासाठी १२ महिने दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९ असा कालावधी होता. तदनंतर ठेकेदार यांना कामात आलेल्या अडचणींचा विचार करता मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.३१/०७/२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७० अन्वये व्दितीय मुदतवाढ देणेत आली होती. ठेकेदार यांना देणेत आलेली सदर वाढीव मूदतही आता संपूष्टात आली आहे.

आता ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी दि.१७/१२/२०२१ रोजीचे पत्राव्दारे, त्यांना कामात आलेल्या अडचणी नमूद करून सदर प्रकल्पातील उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी माहे जून-२०२२ अखेर मूदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे.

याबाबत प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांनी दि.१८/१२/२०२१ चे पत्रान्वये, सदर कामात आलेल्या अडचणी तसेच वस्तुस्थिती नमूद करून ठेकेदार यांना प्रकल्पाचे उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी दि.३०/०६/२०२२ अखेर दंड आकारणी न करता मुदतवाढ देणेची शिफारस केली आहे.

**विभागाचा अभिप्राय:** ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना मा. तदर्थ समितीचे दि.३१/०७/२०२१ चे सभेतील निर्णय क्र.७० अन्वये यापूर्वी दि.३१ ऑक्टोबर-२०२१ अखेर मूदतवाढ देणेत आलेली आहे. तथापी सदर मूदतीत काम पूर्ण होवू शकले नाही. ठेकेदार यांनी दि.१७/१२/२०२१ चे पत्रान्वये, सदर प्रकल्पाची उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी माहे जून-२०२२ अखेर मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे. या प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांनी दि.१८/१२/२०२१ चे पत्रान्वये, सदर कामात आलेल्या अडचणी तसेच वस्तुस्थिती नमूद करून ठेकेदार यांना प्रकल्पाचे उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी दि.३०/०६/२०२२ अखेर दंड आकारणी न करता मुदतवाढ देणेची शिफारस केली आहे

निविदेत Liquidated Damages / Penalty चे अटी शर्तीनूसार ठेकेदार यांना कामाचे विलंबापोटी प्रती दिवस रू.५,४७,५००/- मात्र इतकी दंड आकारणी करणेची तरतूद आहे. सदर रक्कम प्रकल्पाचे किमतीचे जास्तीत जास्त १०% पर्यंत (रू.१०,९५,००,०००/-) कपात करणेची निविदेत तरतूद आहे.

सध्या सदर प्रकल्पाचे काम ठेकेदार यांचेमार्फत प्रगतीत असून जवळपास ७०% काम पूर्ण झालेले आहे. उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी ठेकेदार यांना मुदतवाढ आवश्यक आहे. ठेकेदार यांना सदर प्रकल्पातील उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी माहे जून-२०२२ मूदतवाढ देता येईल, असे नम्र मत आहे.

**प्रस्ताव:** श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे काम प्रगतीत असून ठेकेदार यांनी उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी दि.१७/१२/२०२१ रोजीचे पत्रान्वये दंड आकरणी न करता माहे जून-२०२२ अखेर मूदतवाढ मिळणेची विनंती केली आहे. तसेच आर्किटेक्ट यांनी प्रकल्पाची उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी ठेकेदार यांना मुदतवाढ देणेची शिफारस केली आहे.

तरी सदर प्रकल्पातील उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना माहे जून-२०२२ अखेर दंड आकारणी न करता मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५२** **श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत प्रकल्पाचे उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी सदर कामाचे ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना दंड आकारणी न करता माहे जून-२०२२ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**मा.विश्वस्त यांनी आयत्या वेळी घेतलेले ठराव.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०८**

**ठराव क्र.३५३** संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये असणा-या सर्व खोल्यांची बांधकाम विभागाने पाहणी करुन अहवाल सादर करण्यात यावा. अशी सुचना विश्वस्त, मा.श्री.जयवंतराव जाधव, यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.०९**

**ठराव क्र.३५४** श्री साईबाबा दैनंदिनी छपाईबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. अशी सुचना विश्वस्त मा.श्री.जयवंतराव जाधव यांनी केली. (कार्यवाही- प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१०**

**ठराव क्र.३५५** मंदिर परिसरात सुरु असलेले अगरबत्ती विक्री स्टॉल करीता देण्यात आलेली तीन महिने कालावधीची मुदत संपलेली असल्याने सदर अगरबत्ती विक्री स्टॉल बंद करण्यात यावेत. तसेच संस्थान व्यतिरिक्त कोणीही खाजगी इसमाने कोणतीही उत्पादने मंदिर परिसरात विकू नये. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बगीचा विभाग/संरक्षण विभाग/मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.११**

**ठराव क्र.३५६** संस्थानचे शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांकरीता स्कुल बस सुविधा पुर्ववत सुरु करण्यात यावी. अशी सुचना विश्वस्त मा.डॉ.एकनाथ गोंदकर यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वाहन विभाग/शैक्षणिक संकुल)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१२**

**ठराव क्र.३५७** श्रींचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांचे आधारकार्ड स्कॅन करण्यासाठी स्कॅनर देणगी स्वरुपात अथवा खरेदी करणेबाबत पूर्तता करावी. अशी सुचना विश्वस्त मा.श्री. महेंद्र शेळके यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. (कार्यवाही- संरक्षण विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१३**

**ठराव क्र.३५८** संस्थानचे दोन्हीही रुग्णालय संगणकीकृत करणेकामी कार्यवाही करण्यात यावी. याकामी आवश्यक असणारे update software खरेदी करणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन घेण्यात यावे. दोन तज्ञ व्यक्ती, संस्थानचे अधिकारी व जे विश्वस्त उपलब्ध होतील त्यांचेसह पुणे, मुंबई या सारख्या मोठया शहारातील रुग्णालयांना भेटी देऊन तेथील software व संगणकीकृत कामकाजाची माहिती घ्यावी. update software खरेदी बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा. अशी सुचना विश्वस्त मा.श्री.जयवंतराव जाधव यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१४**

**ठराव क्र.३५९** संस्थान मालकीच्या पडीक व रिकाम्या असणा-या जागेची पाहणी करुन त्यावर गार्डन उभारणी बाबत प्रस्ताव सादर करावा. अशी सुचना विश्वस्त मा.श्री.जयवंतराव जाधव यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग/बगीचा विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१५**

**ठराव क्र.३६०** हॉस्पिटलमधील विविध विभागात देण्यात येणा-या सेवा तसेच संस्थानचे विविध विभागामार्फत करण्यात येत असलेल्या कामांबाबत त्या-त्या क्षेत्रातील नामांकित साईभक्त डॉक्टर तसेच तज्ञ व्यक्ती यांची कॉन्फरन्स आयोजित करण्यात यावी. अशी सुचना विश्वस्त, मा.श्री.जयवंतराव जाधव, यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. या संदर्भातील पुढील कार्यवाही संस्थान प्रशासनाने करावी. (कार्यवाही- सर्व विभाग )

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१६**

**ठराव क्र.३६१** संस्थानमार्फत नाममात्र दरात वैद्यकीय तपासण्या सुरु करण्यात याव्यात. ग्रामिण भागात वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणेबाबत प्राधान्याने विचार करावा. त्यासाठी दोन्ही रुग्णालयातील डॉक्टर्स व स्टॉफ ची माहिती घेऊन पुढील निर्णय घ्यावा. अशी सुचना विश्वस्त मा.श्री.जयवंतराव जाधव, यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. या बाबत पुढील कार्यवाही संस्थान प्रशासनाने करावी.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१७**

**ठराव क्र.३६२** श्री क्षेत्र शेगांव येथे भाविकांनी रोख स्वरुपात देणगी दिल्यास त्यांना संस्थानमार्फत महाराजांचा फोटो (Copy Right) भेट दिला जातो. सदरचा फोटो विक्री करीता उपलब्ध नाही. अशी योजना संस्थानमध्येही राबविणेत यावी. अशी सुचना विश्वस्त मा.श्री.जयवंतराव जाधव यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- मंदिर विभाग/जनसंपर्क विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१८**

**ठराव क्र.३६३** सर्व न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने बाजू मांडणे करीता वरिष्ठ वकिलांचे पॅनल तयार करण्यात यावे. अशी सुचना विश्वस्त मा.श्री.सचिन गुजर यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. (कार्यवाही- विधी विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१९**

**ठराव क्र.३६४** दर्शनरांग व्दारकामाईमध्ये न नेता थेट मंदिरामध्ये नेण्यात यावी. व्दारकामाईत दर्शनासाठी स्वतंत्र रांग ठेवण्यात यावी. अशी सुचना विश्वस्त मा.श्री.सचिन गुजर यांनी केली. यावर सविस्तर चर्चा झाली. तदनंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी व्दारकामाई करीता स्वंतत्र मंदिर समजुन त्याची स्वतंत्र दर्शन व्यवस्था करण्यात यावी, अशी सुचना केली. सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश संस्थान प्रशासनास देण्यात आले. (कार्यवाही- संरक्षण विभाग/मंदिर विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२०**

**ठराव क्र.३६५** संस्थानचे विविध विभागाचे कामकाज जलद व तातडीने होण्याचे दृष्टीने पुर्वीचे व्यवस्थापन समिती मध्ये अस्तित्वात असल्याप्रमाणे उपसमित्या गठीत करण्यात याव्यात. अशी सुचना विश्वस्त मा.डॉ.एकनाथ गोंदकर व मा.श्री.सुरेश वाबळे यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. संस्थान प्रशासनाला कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२१**

**ठराव क्र.३६६** साईभक्तांना हनुमान मंदिर तसेच चावडीमध्ये दर्शनाकरीता जाणेसाठी गेट नंबर तीन बाहेर जाणेसाठी खुले करण्यात यावे. व तेथे फक्त बाहेर जाता येईल असे गेट तयार करावे. अशी सुचना विश्वस्त मा.श्री.सचिन गुजर व मा.डॉ.एकनाथ गोंदकर यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. (कार्यवाही- संरक्षण विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२२**

**ठराव क्र.३६७** संस्थान कर्मचा-यांना कामाचे ठिकाणी अधिकारी वगळता इतर सर्व कर्मचा-यांना मोबाईल वापरण्यास बंदी करण्यात यावी. अशी सुचना विश्वस्त मा.डॉ.एकनाथ गोंदकर यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. (कार्यवाही- संरक्षण विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२३**

**ठराव क्र.३६८** संस्थानचे दोन्हीही रुग्णालयात नर्सिंग स्टॉफ, पॅरॉमेडिकल स्टॉफ व इतर रिक्त जागांबाबत सद्यपरिस्थितीत कर्मचारी उपलब्धतेचा अहवाल घ्यावा मग नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी. अशी सुचना विश्वस्त मा.डॉ.एकनाथ गोंदकर यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. त्याप्रमाणे संस्थान प्रशासनाने कार्यवाही करावी.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२४**

**ठराव क्र.३६९** खाजगी उत्पादन विक्रेत्यांना संस्थान परिसरात जागा/गाळे उपलब्ध करुन देतांना जाहीर लिलाव पध्दतीचा वापर करावा. एकूण उत्पन्नाच्या किती टक्के रक्कम संस्थानला देणार या पध्दतीने जाहीर लिलाव करावा. अशी सुचना मा.अध्यक्ष महोदय यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. अशा पध्दतीचा निर्णय घेण्यात येऊन संस्थान प्रशासनाला निर्देश देण्यात आले. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२५**

**ठराव क्र.३७०** A.I.I.M.S. चे धर्तीवर शिर्डी येथे A.I.I.M.S.चे सेंटर उभारणेत यावे. याकरीता केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत यावा. अशी सुचना विश्वस्त मा.श्री.जयवंतराव जाधव व मा.श्री.सचिन गुजर यांनी केली. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. अशा स्वरुपाचा निर्णय घेऊन तो तात्काळ संस्थान प्रशासनाकडून कार्यान्वीत करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**वरील निर्णय क्र.३३८ ते ३७० सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ०८.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.) | (आ.आशुतोष अशोकराव काळे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**